दैनिक अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक ३०५ । बुधवार १९ ऑगस्ट २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com




# शिवसेनेत फुट नाहीच..?

## सिब्बल यांच्या युक्तिवादाने खटलाच पालटणार?

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षाच्या खटल्यात ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यांच्या युक्तिवादाने सुनावणीला नवे वळण मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. उद्धव ठाकरे यांनी एकनाथ शिंदे यांना राजकीय पद नव्हे, तर पक्षातील जबाबदारी दिली होती, असा मुद्दा मांडत सिब्बल यांनी शिवसेना या मूळ राजकीय पक्षात फुट पडली नसून विधिमंडळ पक्षातच फुट पडली, असा युक्तिवाद केला. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या भूमिकेवरही त्यांनी जोरदार प्रश्न उपस्थित केले.

### सत्तासंघर्षाच्या निकालाकडे राज्याचे लक्ष



सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने १९७१ मधील सादिक अली खटल्याचा संदर्भ उपस्थित केला. मात्र, सदर प्रकरण सध्याच्या शिवसेना वादाला लागू होत नसल्याचे सिब्बल यांनी स्पष्ट केले. सादिक अली प्रकरणात काँग्रेसमध्ये उभी फूट पडली होती आणि दोन्ही गटांनी मूळ पक्ष व निवडणूक चिन्हावर दावा केला होता. त्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयाने मान्यता दिली होती.

सिब्बल यांच्या मते, सध्याच्या प्रकरणात परिस्थिती वेगळी आहे. राजकीय पक्ष आणि त्यातील विधिमंडळ पक्ष या दोन स्वतंत्र बाबी असून, विधिमंडळातील आमदारांच्या फुटीला थेट संपूर्ण राजकीय पक्षाची फूट मानता येणार नाही, असा त्यांच्या युक्तिवादाचा केंद्रबिंदू आहे. राजकीय पक्षामध्ये प्राथमिक सदस्यांपासून राष्ट्रीय व राज्य कार्यकारिणी, स्थानिक पदाधिकारी आणि संपूर्ण संघटनात्मक रचना असते. त्याउलट, पक्षाच्या चिन्हावर निवडून आलेले आमदार व खासदार विधिमंडळात पक्षाचा गट म्हणून कार्य करतात. याच फरकावर सिब्बल यांनी विशेष भर दिला.

त्यामुळे शिवसेनेच्या संघटनात्मक रचनेत फूट पडली होती का आणि केवळ आमदारांच्या संख्याबळावर पक्ष कोणाचा हे ठरवता येते का, हा प्रश्न या युक्तिवादामुळे पुन्हा केंद्रस्थानी आला आहे. सिब्बल यांच्या युक्तिवादामुळे शिवसेनेतील फूट, राजकीय पक्षाचे अस्तित्व, विधिमंडळ पक्षाचे अधिकार आणि पक्षांतरबंदी कायदा यावरील कायदेशीर चर्चा पुन्हा ऐरणीवर आली आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयातील या सुनावणीचा पुढील टप्पा महाराष्ट्राच्या राजकारणासाठी निर्णायक ठरण्याची शक्यता आहे.

### नार्वेकरांचा पलटवार

सिब्बल यांच्या आरोपांवर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी तीव्र प्रतिक्रिया दिली. कपिल सिब्बल हे त्यांच्या पक्षकारासाठी युक्तिवाद करत आहेत. मी जो निर्णय दिला आहे, तो कायद्याच्या चौकटीत राहून आणि सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या निकषांनुसारच दिला आहे. अध्यक्षांनी काय ठरवले हे त्यांना कसे समजले? असा सवाल नार्वेकर यांनी केला.बिनबुडाचे आरोप करून कोणताही फरक पडत नाही. मी दिलेला निर्णय अत्यंत शाश्वत आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### 'सहा खासदार ऑन दि स्पॉट अपात्र ठरतील'

दरम्यान, नुकतेच शिंदे गटात गेलेल्या शिवसेनेच्या सहा खासदारांच्या संभाव्य अपात्रतेबाबतही विधिज्ञ असीम सरोदे यांनी मोठा दावा केला आहे. सादिक अली खटला झाला तेव्हा पक्षांतरबंदी कायदा अस्तित्वात नव्हता. मूळ पक्ष कुणाचा हे केवळ आमदारांच्या संख्याबळावर ठरवता येऊ नये, हा त्या प्रकरणाचा गाभा होता, असे सरोदे यांनी सांगितले. त्यामुळे शिंदे गटात गेलेल्या सहा खासदारांच्या बाबतीतही अपात्रतेची टांगती तलवार असल्याचा दावा त्यांनी केला आहे.

# जायकवाडी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यासाठी ६ हजार ४७७ कोटींची तरतूद

## पाच जिल्ह्यांतील १ लाख ३१ हजार ६५२ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ; मंत्रिमंडळ बैठकीत १० महत्त्वाचे निर्णय

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** मराठवाड्यासह राज्यातील सिंचन क्षेत्राला मोठा दिलासा देणाऱ्या निर्णयात जायकवाडी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यासाठी ६ हजार ४७७ कोटी ८८ लाख रुपयांच्या आर्थिक तरतुदीला मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. या प्रकल्पामुळे पाच जिल्ह्यांतील सुमारे १ लाख ३१ हजार ६५२ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळणार आहे. यासोबतच गौण खनिजांच्या उत्खनन व वाहतुकीवर नियंत्रण आणण्यासाठी नियमांमध्ये सुधारणा, वित्त व नियोजन विभागांची पुनर्रचना, धान व भरडधान्याच्या वाहतूक खर्चासाठी ३२८ कोटी ४७ लाखांची तरतूद यासह विविध महत्त्वाचे निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आले.

**पंढरपूर विकास आराखड्याला गती**

पंढरपूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसर आणि वाणिज्य संकुल आराखड्यातील तब्बल ३ हजार ९९३ कोटी ९० लाख रुपयांच्या विकासकामांना गती देण्याचा निर्णय घेण्यात आला. वाढती वारकरी संख्या आणि पंढरपूरचे धार्मिक महत्त्व लक्षात घेऊन विशेष धोरण तयार करण्यात आले आहे

जायकवाडी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यासाठी ६ हजार ४७७ कोटी ८८ लाख रुपयांची तरतूद मंजूर करण्यात आली. या निर्णयामुळे प्रकल्पाशी संबंधित कामांना गती मिळणार असून, पाच जिल्ह्यांतील १ लाख ३१ हजार ६५२ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

गौण खनिजांच्या उत्खनन आणि वाहतुकीवर प्रभावी नियंत्रण आणण्यासाठी विद्यमान नियमांमध्ये सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली. अवैध उत्खनन व वाहतुकीला आळा घालण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.

राज्याच्या आर्थिक नियोजन आणि प्रशासकीय कामकाजाला अधिक गतिमान करण्यासाठी वित्त व नियोजन विभागांच्या पुनर्रचनेस मंत्रिमंडळाची मंजुरी देण्यात आली. धान आणि भरडधान्याच्या वाहतूक खर्चासाठी ३२८ कोटी ४७ लाख रुपयांची तरतूद करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे संबंधित शासकीय यंत्रणा आणि लाभार्थ्यांना आर्थिक मदत उपलब्ध होणार आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागातील सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योजक तसेच कंत्राटदारांची प्रलंबित देयके वेळेत अदा करण्यासाठी ट्रेडस प्लॅटफॉर्म प्रणालीचा वापर करण्यास मंजुरी देण्यात आली. गडचिरोली जिल्हा क्रीडा संकुलाच्या दुसऱ्या टप्प्यातील विविध क्रीडा सुविधांसाठी सुमारे ८० कोटी १२ लाख रुपयांच्या कामांना अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला.सोलापूरमधील श्री जांबुमनी मोची समाज सेवा मंडळाला शैक्षणिक उपक्रमांसाठी ३ हजार ९१० चौरस मीटर शासकीय जमीन देण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. पुणे जिल्ह्यातील मोशी येथील १५ हेक्टर शासकीय जमीन विविध संस्थांना देऊन मागास व वंचित आदिवासी समाजासाठी सर्वांगीण विकास केंद्र उभारण्याचा निर्णय घेण्यात आला.पुण्यात २०३२ मध्ये युसीआय रोड वर्ल्ड चॅम्पियनशिप आयोजित करण्यासाठी शासनाकडून पाठबळ देण्यास मान्यता देण्यात आली. या आंतरराष्ट्रीय स्पर्धेमुळे सुमारे ३३० कोटी रुपयांची आर्थिक उलाढाल अपेक्षित आहे.

# वैदुवाडीत मावा बनविणाऱ्या कारखान्यावर छापा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** सावेडी उपनगरातील वैदुवाडी येथे सुरू असलेल्या मावा बनवणाऱ्या कारखान्यावर स्थानिक गुन्हे शखेच्या पथकाने छापा टाकला. यावेळी पोलिसांनी सुमारे दीड लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. यावेळी बबन रामा लोखंडे (रा. लोखंडे चाळ, वैदुवाडी, सावेडी) याला ताब्यात घेण्यात आले. याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली माहिती अशी की, वैदुवाडी परिसरात मावा बनविणारा कारखाना सुरू असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त बातमीदारामार्फत समजली. त्या आधारे पोलीस पथकाने वैदुवाडी येथे एका पत्राच्या खोलीमध्ये छापा टाकून इलेक्ट्रिक मशीन वर मावा तयार करणाऱ्या बबन रामा लोखंडे याला ताब्यात घेतले.

### दीड लाखाचा मुद्देमाल हसगत: एकास अटक

त्याच्या कब्जातून १ लाख २० हजार रुपये किमतीचे मावा तयार करण्याचे इलेक्ट्रिक मशीन ,१० हजाराचा ५ किलो तयार मावा, १४ हजाराची २० किलो सुगंधित तंबाखू मिश्रित सुपारी व छोट्या प्लास्टिक पुड्या असा एकूण १ लाख ४४ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. यावेळी पोलीस पथकाने अधिक चौकशी केली असता त्याने मावा तयार करण्यासाठी लागणारी सुगंधित तंबाखू व सुपारी मेहराज (पूर्ण नाव माहित नाही, रा. मुकुंद नगर) यांचकडून आणल्याची माहिती समजली. या कामी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे, पोलीस अंमलदार शाहीर शेख, अरविंद भिंगारदिवे, योगेश भिंगारदिवे, संदीप पवार, विजय ठोंबरे, गणेश धोत्रे, सागर ससाने व सोनल भागवत यांच्या पथकाने परिश्रम घेतले.

# ग्राहक सेवा केंद्र चालकावर अखेर फसवणुकीचा गुन्हा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर :** जनधन खात्यातील रक्कम दुसऱ्या बँक खात्यात वर्ग करण्याच्या नावाखाली खातेदाराच्या परवानगीशिवाय स्वतःच्या खात्यावर रक्कम वर्ग केल्याप्रकरणी नांदुरी दुमाला येथील स्टेट बँक ग्राहक सेवा केंद्र चालक गणेश लक्ष्मण दुधवडे याच्याविरुद्ध संगमनेर तालुका पोलिसांत फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्या दखलीनंतर व पोलीस उपअधीक्षक डॉ. कुणाल सोनवणे यांच्या चौकशीनंतर ही कारवाई करण्यात आली.

### अप्पर पोलीस अधीक्षकांच्या दखलीनंतर कारवाई

फिर्यादी मुरलीधर साबळे यांचे स्टेट बँक ऑफ इंडियाच्या संगमनेर शाखेत जनधन खाते आहे. त्यांच्या खात्यात २२ सप्टेंबर २०२३ रोजी आठ लाख रुपये जमा झाले होते. जनधन खात्यात एवढी मोठी रक्कम ठेवता येत नसल्याचे सांगून दुधवडे यांनी साबळे यांना रक्कम त्यांच्या ॲक्सिस बँक खात्यात वर्ग करण्यास सांगितले.त्यानंतर साबळे यांच्या घरी जाऊन अंगठ्याचा ठसा घेऊन दुधवडे यांनी व्यवहार केला. मात्र ६० हजार रुपयांपैकी ३० हजार रुपये स्वतःच्या खात्यावर, (पान ४ वर)

# सर्पदंश आता 'अधिसूचित आजार'

## आ. विक्रम पाचपुते यांच्या पाठपुराव्याला यश

### विधानसभेतील मागणीला शासनाचा हिरवा कंदील

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** राज्यातील सर्पदंशाच्या घटनांची अचूक नोंद, मृत्यू व अपंगत्वाचे प्रमाण कमी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने सर्पदंशाला 'अधिसूचित आजार' म्हणून घोषित करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. श्रीगोंदा विधानसभा मतदारसंघाचे आमदार विक्रम पाचपुते यांनी ३० जून रोजी विधानसभेत उपस्थित केलेल्या मागणीला या निर्णयामुळे यश आले आहे.

सर्पदंशाच्या प्रत्येक घटनेची शास्त्रशुद्ध नोंद व्हावी, रुग्णांना वेळेत अँटी-स्नेक व्हेनम (अडत) उपलब्ध व्हावे आणि सर्पदंशामुळे होणारे मृत्यू तसेच दीर्घकालीन अपंगत्व याबाबत राज्याचा विश्वासार्ह डेटाबेस तयार व्हावा, अशी मागणी आ. पाचपुते यांनी विधानसभेत केली होती. आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी त्यावेळी सकारात्मक भूमिका घेत कार्यवाहीचे आश्वासन दिले होते. सातत्यपूर्ण



पाठपुराव्यानंतर शासनाने हा निर्णय घेतल्याचे आ. पाचपुते यांनी म्हटले आहे.

**प्रत्येक सर्पदंशाची नोंद बंधनकारक**

या निर्णयामुळे शासकीय व खासगी रुग्णालये, वैद्यकीय महाविद्यालये तसेच संबंधित वैद्यकीय व्यावसायिकांना त्यांच्या निदर्शनास आलेल्या संशयित, संभाव्य किंवा निश्चित सर्पदंशाच्या घटनांची आणि सर्पदंशामुळे झालेल्या मृत्यूंची नोंद आरोग्य यंत्रणेकडे करणे बंधनकारक होणार आहे.सर्पदंशाचे ठिकाण व तारीख, विषबाधेची लक्षणे, उपचार, देण्यात आलेल्या अडत कुप्यांची संख्या, रुग्णाला अन्य रुग्णालयात हलविण्यात आले असल्यास त्याचा तपशील आणि उपचाराचा अंतिम परिणाम यासारखी माहिती नोंदविली जाणार आहे.त्यामुळे सर्पदंशाचे प्रमाण कोणत्या जिल्ह्यात अथवा तालुक्यात अधिक आहे, कोणत्या कालावधीत घटना वाढतात, उपचारांची सुविधा कुठे अपुरी आहे आणि अडतचा अतिरिक्त साठा कुठे आवश्यक आहे, याचे शास्त्रीय विश्लेषण करणे शक्य होणार आहे.

**'हॉटस्पॉट' निश्चित करण्यास मदत**

सर्पदंशाच्या घटनांचा राज्यव्यापी डेटा उपलब्ध झाल्यानंतर सर्पदंशाचे संभाव्य 'हॉटस्पॉट' निश्चित करता येणार आहेत. त्यानुसार अडतचा साठा व वितरण, उपचार केंद्रांची उपलब्धता, प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि जनजागृती मोहिमा अधिक प्रभावीपणे राबविता येतील.

विशेष म्हणजे, सर्पदंशातून बचावलेल्या रुग्णांच्या उपचारानंतरच्या आरोग्यस्थितीचाही (पान ४ वर)

# यंदा दुष्काळाची ७० टक्के शक्यता

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** महाराष्ट्रासह संपूर्ण देशाची चिंता वाढविणारा हवामानाचा अंदाज समोर आला आहे. खासगी हवामान अंदाज संस्था स्कायमेटने यंदाच्या नैऋत्य मान्सूनच्या अंदाजात मोठी कपात करत सरासरीच्या (एलपीए) केवळ ८५ टक्के पाऊस पडण्याची शक्यता व्यक्त केली आहे. यापूर्वी एप्रिलमध्ये संस्थेने सरासरीच्या ९४ टक्के पावसाचा अंदाज दिला होता. आता त्यात आणखी घट करण्यात आली असून, यंदा दुष्काळी परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता ७० टक्के असल्याचे स्कायमेटने म्हटले आहे. एल निनोची वाढती ताकद आणि सकारात्मक इंडियन ओशन डायपोलबाबतची अनिश्चितता ही त्यामागील प्रमुख कारणे असल्याचे संस्थेने स्पष्ट केले आहे.

स्कायमेटच्या अहवालानुसार, १ जून ते ३१ जुलैदरम्यान देशात सरासरीपेक्षा १३ टक्के कमी पाऊस झाला आहे. त्यामुळे मान्सूनच्या उर्वरित कालावधीबाबत चिंता वाढली आहे. ऑगस्टमध्ये एलपीएच्या केवळ ८४ टक्के, तर सप्टेंबरमध्ये ८० टक्के पाऊस पडण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. स्कायमेटचे व्यवस्थापकीय संचालक जतिन सिंह यांच्या मते, एल निनोची (पान ४ वर)

# हरिगाव मळ्यात वारसांसाठी ३ हजार एकर राखीव!

## महसूलमंत्र्यांचे शिष्टमंडळाला आश्वासन; मंत्रिमंडळाच्या मंजुरीनंतर प्रस्ताव राज्यपालांकडे पाठविणार

### उर्वरित जमीन उद्योगांना देण्याचा सरकारचा निर्णय

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

माळवाडगाव : अकारी पडीत जमिनींच्या प्रश्नावर गेल्या अनेक वर्षांपासून संघर्ष करणाऱ्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. शेती महामंडळाच्या हरिगाव मळा कार्यक्षेत्रातील सर्व जमिनींचे सर्वे क्रमांक व नकाशे तयार करण्यात आले असून, अकारी पडीत शेतकऱ्यांच्या वारसांसाठी हरिगाव मळ्यात सुमारे ३ हजार एकर जमीन राखीव ठेवण्यात आली आहे. तसेच महामंडळाच्या



(छाया : भाऊसाहेब काळे)

अन्य मळ्यांमध्ये सुमारे १ हजार ५०० एकर जमीन राखीव ठेवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. उर्वरित जमीन उद्योगांसाठी देण्याचे निश्चित करण्यात आल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

अकारी पडीत शेतकऱ्यांच्या प्रश्नावर शेतकरी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष ॲड. अजित काळे यांच्या नेतृत्वाखाली महिला व पुरुष शेतकऱ्यांनी हरिगाव मळा कार्यालयासमोर अन्नत्याग उपोषण सुरू केले होते. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी महसूलमंत्री बावनकुळे यांच्याशी संवाद साधल्यानंतर उपोषण स्थगित करण्यात आले. त्यानंतर महसूलमंत्र्यांनी आपल्या शासकीय निवासस्थानी अकारी पडीत कृती समितीच्या शिष्टमंडळाला चर्चेसाठी वेळ दिली. बैठकीत ॲड. अजित काळे यांनी अकारी पडीत जमिनीच्या प्रश्नाशी संबंधित कागदपत्रे व न्यायालयीन निर्णय महसूलमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले. त्यानंतर बावनकुळे यांनी सांगितले की, हरिगाव (पान ४ वर)



### महसूलच्या संकेतस्थळावर स्वतंत्र 'अकारी पडीत' विभाग

अकारी पडीत शेतकऱ्यांसाठी महसूल विभागाच्या संकेतस्थळावर लवकरच स्वतंत्र सुविधा सुरू करण्यात येणार असल्याची माहिती महसूलमंत्री बावनकुळे यांनी दिली. या माध्यमातून जमिनीच्या परत वाटपाच्या प्रक्रियेबाबत माहिती उपलब्ध करून देण्यात येणार असून, शेतकऱ्यांनी प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत संयम बाळगावा, असे आवाहन त्यांनी केले.

### मुख्यमंत्री म्हणाले, प्रश्नात लक्ष घालतो

महसूलमंत्र्यांच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीनंतर ॲड. अजित काळे व भाजपा जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. अकारी पडीत जमिनीच्या प्रश्नासंदर्भात उच्च न्यायालयाच्या निकालाची माहिती देत ॲड. काळे यांनी मुख्यमंत्र्यांना निवेदन दिले. या प्रश्नात आपण लक्ष घालू, असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले.

# आंदोलनाची धार की कायद्याचा बडगा?

**मंगेश साबळे यांची सामाजिक आणि राजकीय पार्श्वभूमी पाहिली तर ती अत्यंत संघर्षाची व तितकीच वादळी राहिली आहे. मराठा आरक्षण आंदोलनात भररस्त्यात स्वतःची कार पेटवून देऊन त्यांनी राज्यभराचे लक्ष वेधले होते. त्यानंतर २०२४ च्या जालना लोकसभा निवडणुकीत अपक्ष उमेदवार म्हणून उतरत त्यांनी घेतलेली लाखांहून अधिक मते त्यांच्या जनसंपर्काची आणि वाढत्या लोकप्रियतेची साक्ष देतात. शिक्षण, आरोग्य आणि शेतकरी प्रश्नांवर अधिकाऱ्यांना थेट धारेवर धरणे, पंचायत समितीत नोटांचे बंडल उधळणे किंवा प्रशासकीय कार्यालयांत थेट आंदोलन करणे यांसारख्या 'स्टंटबाजी' सदृश पण लक्षवेधी शैलीमुळे ते अल्पावधीत तरुणांच्या गळ्यातील ताईत बनले.**

विशेष संपादकीय
करण नवले (संपादक)

मात्र, आंदोलनाच्या या आक्रमक शैलीनेच त्यांना कायद्याच्या कचाट्यात सापडवले आहे. पोलिसांच्या दाव्यानुसार, साबळे यांच्यावर विविध पोलीस ठाण्यांत तब्बल आठ गंभीर गुन्हे दाखल आहेत. शासकीय कामात अडथळा, अधिकाऱ्यांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करणे, आत्मदहनाची धमकी देणे, बेकायदा जमाव जमवणे आणि व्यापाऱ्यांकडून वसुली करणे यांसारखे आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आले आहेत. शासकीय अधिकाऱ्यांना वेठीस धरणे आणि कायद्याची मर्यादा ओलांडणे ही बाब प्रशासनाच्या दृष्टीने गंभीर मानली जात आहे.

दुसऱ्या बाजूला, पोलिसांच्या या तडीपारीच्या कारवाईमागे राजकीय वास येत असल्याचा संशय खुद्द साबळे आणि त्यांच्या समर्थकांनी व्यक्त केला आहे. वरिष्ठ अधिकारी आणि आयएएस/आयपीएस दर्जाचे सनदी अधिकारी हे सत्ताधाऱ्यांचे बाहुले बनून काम करत असल्याचा थेट आरोप साबळे यांनी केला आहे. ज्या ज्या वेळी लोकप्रतिनिधी किंवा सामाजिक कार्यकर्ते भ्रष्टाचाराविरोधात आवाज उठवतात किंवा व्यवस्थेला आव्हान देतात, त्या त्या वेळी त्यांच्यावर खोटे गुन्हे दाखल करून त्यांची



नाकेबंदी करण्याची प्रशासकीय पद्धत नवीन नाही. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या गाडीसमोर आंदोलन केल्यानंतर लगेचच झालेली कारवाई आणि गोपनीय साक्षीदारांच्या आधारे बजावलेली नोटीस, यावरून राजकीय दबावाचा संशय बळावतो.

कायद्याचे राज्य टिकवण्यासाठी प्रशासनाला कडक पावले उचलावीच लागतात, यात शंका नाही. परंतु, लोकशाहीत लोकप्रतिनिधींचा आवाज दडपण्यासाठी किंवा राजकीय प्रतिस्पर्ध्यांचा काटा काढण्यासाठी जर कायद्याचा आणि तडीपारीसारख्या हत्यारांचा गैरवापर होत असेल, तर ते चिंताजनक आहे. मंगेश साबळे यांनीही आपल्या आंदोलनांना कायद्याच्या चौकटीत ठेवणे गरजेचे होते, कारण सनसनाटी आंदोलनांनी तात्पुरती प्रसिद्धी मिळते, पण कायदेशीर लढाईत ती अंगलट येते. आता हे प्रकरण केवळ एका सरपंचाच्या तडीपारीपुरते मर्यादित राहिलेले नसून, 'प्रशासकीय मनमानी विरुद्ध लोकप्रतिनिधीचा संघर्ष' अशा वळणावर येऊन ठेपले आहे. पोलीस प्रशासन या प्रकरणाचा तपास निष्पक्षपणे करते की एकतर्फी कारवाईचा बडगा उगारते, यावरच प्रशासनाची विश्वासार्हता ठरणार आहे.

# संकल्प अभिनव भारत फाउंडेशन तर्फे उत्तीर्ण अग्निवीर उमेदवारांचा सत्कार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान :** संकल्प अभिनव भारत फाउंडेशन, पुणे यांच्या वतीने टाकळीभान, श्रीरामपूर येथे गेल्या सहा महिन्यांपासून अग्निवीर तसेच सैन्य भरतीसाठी पूर्व प्रशिक्षण वर्ग सुरू आहेत. या वर्गांमध्ये लेखी परीक्षा व मैदानी तयारी या दोन्ही बाबींवर विशेष भर देण्यात येत आहे. येथील प्रशिक्षणार्थी मुलांना संकल्प अभिनव भारत फाउंडेशन पुणे तर्फे टाकळीभान गावातील मान्यवर व पदाधिकारी यांच्या हस्ते शूज वाटप करण्यात आले व त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी शेतकरी संघटनेचे प्रभारी व प्रवक्ते प्रा. कार्लस साठे, पत्रकार अर्जुन राऊत, भाजप जिल्हा उद्योग आघाडीचे अनिल बोडखे, विश्व धावपटू भाऊसाहेब गव्हाणे, मेजर राहुल औटी, मयूर लोणारे आदींच्या हस्ते शूज वाटप व सत्काराचा कार्यक्रम संपन्न झाला.

ग्रामीण भागातील युवकांना सशस्त्र दलात भरती होण्यासाठी आवश्यक असलेली तयारी मिळावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमासाठी फाउंडेशनचे संस्थापक इंद्रजीत देशमुख, प्रा. साईनाथ गायके, तसेच प्रशिक्षक सागर कणसे सर यांचे मोलाचे योगदान लाभले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे व अथक प्रयत्नांमुळे हा वर्ग सातत्याने सुरू राहिला आहे.

ग्रामीण युवकांना सशस्त्र दलात संधी मिळावी व त्यांच्यातील क्षमतांचा विकास व्हावा, यासाठी संकल्प अभिनव भारत फाउंडेशन पुढाकार घेत आहे. स्थानिकांच्या सहकार्याने हा उपक्रम अधिक प्रभावी ठरत असल्याचे दिसून येत आहे.



# कोल्हार येथे श्रावण मासानिमित्त साई चरित्र पारायणास प्रारंभ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोल्हार :** कोल्हार भगवतीपुर येथील साई भगवती ग्रुपच्या वतीने श्रावण मासानिमित्त येथील ग्रामदैवत भगवती माता मंदिराच्या सभामंडपात साई सच्चरित पारायण सोहळ्यास मोठ्या उत्साहात व भक्तिमय व मंगलमय वातावरणात प्रारंभ झाला. या पारायण सोहळ्यात महिला पारायणार्थींची संख्या लक्षणीय आहे. आज मंगळवारी पारायण दरम्यान रुद्र अभिषेक झाला. पारायण सोहळ्याचे व्यासपीठ चालक गणेश महाराज मुसमाडे असून दैनंदिन पूजा सुनील काका कुलकर्णी करीत आहेत. पारायण सोहळ्यात रोज सकाळी सहा वाजता श्रीची काकड आरती ७ ते ११ साई ची आरती व ग्रंथ वाचन व इतर धार्मिक कार्यक्रम संपन्न होतील गुरुवार दि. २० ऑगस्ट रोजी सकाळी सात वाजता ग्रंथ अवतरणीका वाचन नंतर ग्रंथ पालखीची सवाद्य मिरवणूक व दहा ते बारा या वेळेत श्री साई कथाकार हरिभक्त परायण विकास महाराज गायकवाड यांचे काल्याचे किर्तन संपन्न होईल. त्यानंतर महाप्रसाद वाटपाने पारायण सोहळ्याची सांगता होणार आहे. साई सच्चरित्र पारायण याचे हे अठरावे वर्ष आहे.

# जायगुडे आखाडा येथील अखंड हरिनाम सप्ताहाची काल्याच्या किर्तनाने सांगता

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** तालुक्यातील जायगुडे आखाडा येथे राष्ट्रसंत भास्करगिरी महाराज यांच्या प्रेरणेने श्रावण मासानिमित्त हनुमान मंदिरामध्ये आयोजित त्रिदिनात्मक अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज यांच्या काल्याच्या किर्तनाने दहींहंडी फोडून भक्तिमय वातावरणात करण्यात आली. काल्याचे शाश्वत सुख प्राप्त करून घ्यायचे असेल तर आपल्या इंद्रियांना भगवंताच्या भक्तीकडे वळवा असे आवाहन स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज यांनी केले.



अखंड हरिनाम सप्ताह प्रसंगी स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज यांच्या समवेत शोभायात्रा मिरवणूक काढण्यात आली.यावेळी जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांच्या वतीने लेझीम झांज पथकाद्वारे स्वागत करण्यात आले.

कीर्तनात बोलतांना स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज म्हणाले की धार्मिक सोहळे हे गावोगावी साजरे होतात त्यासाठी देव व धर्माचे कार्य समजून सर्वांनी सहकार्य केले पाहिजे, देवाची सेवा म्हणून केलेली सेवा ही जीवनात नेहमी फलदायी ठरत असते. यामुळे शुद्ध पुण्याची प्राप्ती आपल्याला होते.

यावेळी झालेल्या काल्याच्या किर्तन प्रसंगी पारायण सोहळा कमिटीच्या वतीने बाबासाहेब चव्हाण, अशोक बेद्रे, विलास कोकणे, दत्ता जायगुडे, अशोक गंडाळ, गणेश गंडाळ,चैतन्य तनपुरे, आबा कोतकर,गणेश जायगुडे, ज्ञानेश्वर जायगुडे,महेश चव्हाण अमोल चव्हाण, भारत चव्हाण, किरण चव्हाण, संतोष तनपुरे, पविन चव्हाण, शरद चव्हाण यांच्या वतीने स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज यांचे संतपूजन करण्यात आले.

# साईश ढोकणेचे विविध राज्यस्तरीय परीक्षांत घवघवीत यश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बेलापूर :** येथील एस. के. सोमय्या प्राथमिक विद्या मंदिरमधील इयत्ता चौथीचा विद्यार्थी चिरंजीव साईश रामेश्वर ढोकणे याने विविध राज्यस्तरीय शिष्यवृत्ती व स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले अहे. त्याच्या या कामगिरीबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.राज्यस्तरीय शिष्यवृत्ती परीक्षेत साईशने ३०० पैकी २५६ गुण मिळवून जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीत २७वा क्रमांक पटकावला. राज्यस्तरीय ऑलिम्पियाड स्पर्धेत २०० पैकी १८८ गुण मिळवत राज्यात सहावा व जिल्ह्यात तिसरा क्रमांक मिळविला. लक्षवेध राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षेत ३०० पैकी २७८ गुण मिळवून राज्यात सातवा व जिल्ह्यात तिसरा क्रमांक मिळविला.नॅशनल स्कॉलरशिप परीक्षेत २०० पैकी १८८ गुणांसह राज्यात नववा व जिल्ह्यात तिसरा, तर भारत टॅलेंट सर्च (इढड) परीक्षेत १५० पैकी १३० गुण मिळवून राज्यात बारावा व जिल्ह्यात चौथा क्रमांक मिळविला. मंथन सामान्य ज्ञान परीक्षेतही ३०० पैकी २६४ गुण मिळवत राज्यात १९वा व जिल्ह्यात १४वा क्रमांक मिळविला.साईशला मुख्याध्यापिका सोनाली पैठणे, वर्गशिक्षिका मेघा पवार यांचे मार्गदर्शन लाभले. त्याच्या यशाबद्दल पोलीस अधिकारी, पत्रकार संघाचे पदाधिकारी व ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

# चितळवेढे जिल्हा परिषद शाळेत स्वातंत्र्य दिन उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** अकोले तालुक्यातील चितळवेढे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत ८०वा स्वातंत्र्य दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. जल अभ्यासक भिला सोनू पाटील व निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाचे जिल्हा संघटक तथा पत्रकार अर्जुन राऊत यांच्या हस्ते



ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी भिला पाटील यांनी गावांचा विकास झाला तरच देशाची प्रगती अधिक वेगाने होईल, असे सांगत वृक्षसंवर्धन, पर्यावरण व पाणी बचतीचे महत्त्व स्पष्ट केले. अर्जुन राऊत यांनी चितळवेढेच्या निसर्गसौंदर्याचे कौतुक करून ग्रामस्थांमधील माणुसकी, प्रेम व जिव्हाळ्याचे कौतुक केले.विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर नृत्य-गीते सादर केली. तसेच पर्यावरण, भ्रष्टाचार, स्वातंत्र्यसैनिक व देशभक्ती या विषयांवर मनोगते व्यक्त केली. विविध शैक्षणिक स्पर्धांतील गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात आली. पाहुण्यांच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय बॅग व खाऊचे वाटप करण्यात आले. उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकांचा सन्मान करण्यात आला.मुख्याध्यापक जगदीश झडे, उपाध्यापक पिराजी पवार, शैला देशमुख, अंजली भोसले, सरपंच नवनाथ आरोटे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष किसन आरोटे यांच्यासह शिक्षक, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रौप्य महोत्सवी माहूरगड पदयात्रेची नवचंडी महायज्ञाने सांगता



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** तालुक्यातील वडाळा महादेव येथील श्रीक्षेत्र रेणुका देवी आश्रम ते माहूरगड या रौप्य महोत्सवी पदयात्रेची सांगता माहूरगड येथे राजराजेश्वरी रेणुका देवीसमोर नवचंडी महायज्ञाने करण्यात आली. तब्बल ४५० किलोमीटरची पायी पदयात्रा पूर्ण करून दिंडी सोहळा १५ ऑगस्ट रोजी माहूरगडावर पोहोचला.

पदयात्रेचे यंदा २५वे वर्ष असल्याने सप्तशती पाठ व नवचंडी महायज्ञाचे आयोजन करण्यात आले होते. देवीच्या मुख्य गाभाऱ्यात पदयात्रेचे संस्थापक मौनयोगी रेवननाथ महाराज यांच्या पादुका तसेच दिंडीतील उत्सवमूर्तींचे विशेष पूजन मुख्य पुजारी चंद्रकांत भोपी, आशिष जोशी व अरविंद देव गुरुजी यांच्या हस्ते करण्यात आले. महायज्ञाचे पौरोहित्य वे.शा.सं. अरविंद देव गुरुजी यांच्यासह ओंकार गुरुकुलकर्णी व सचिन गुरू कोल्हाटकर यांनी केले. दिंडी सोहळ्याचे चालक श्री. व सौ. आदिनाथ जोशी यांच्या हस्ते पूर्णाहुती देण्यात आली. त्यानंतर महायज्ञ व पदयात्रा सोहळ्याची विधिवत सांगता झाली. वाशिम येथील गोपाल विष्णुपंत घोडके परिवाराच्या वतीने भाविकांसाठी पुरणपोळी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच माहूरगड येथील प्रसिद्ध तांबूल प्रसादाचे भाविकांना वितरण करण्यात आले. यावेळी विविध भागांतील शिष्य परिवार, वेदमूर्ती, साधक व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी रेणुका भक्त मंडळ, सद्गुरु सेवा मंडळ व पदयात्रा समन्वय समितीच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# काँग्रेस अध्यक्ष खा. मल्लिकार्जुन खरगे यांच्यावरील निंदनीय कृत्याचा जिल्हा काँग्रेसकडून निषेध



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** भारतीय राष्ट्रीय काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष खासदार मल्लिकार्जुन खर्गे यांच्या हलदवाणी, उत्तराखंड येथील सभेनंतर उजव्या विचार सरणीच्या संघटनांनी गंगाजलाने शुद्धीकरण केले या निंदनीय कृत्याचा जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने आमदार हेमंत ओगले यांच्या नेतृत्वाखाली तहसीलदारांना निवेदन देऊन निषेध करण्यात आला.

यावेळी नगराध्यक्ष करण ससाणे म्हणाले की, हा अपमान केवळ काँग्रेस अध्यक्ष खर्गे यांचा नसून समता, बंधुता, सामाजिक न्याय आणि मानवी प्रतिष्ठा या घटनात्मक मूल्यांना दिलेला धक्का असल्याचे म्हटले. जिल्हाध्यक्ष सचिन गुजर म्हणाले की, भारतीय संविधानाच्या आधारे चालणाऱ्या लोकशाही समाजात अशा प्रकारचा भेदभाव आणि मनुस्मृतीच्या मानसिकतेला वेळीच आळा बसणे गरजेचे आहे जाणीवपूर्क एखाद्या राष्ट्रीय पक्षाच्या अध्यक्षाला लक्ष करुन अपमानित करणे ही बाब न्याय व्यवस्थेला काळीमा फासणारी असल्याचे म्हटले आहे.माजी सभापती बाबासाहेब दिघे, जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष ज्ञानेश्वर मुरकुटे यांनी देखील मनोगत व्यक्त करत निषेध नोंदवाला.यावेळी तालुकाध्यक्ष प्रमोद भोसले, शहराध्यक्ष अण्णासाहेब डावखर, सभापती योगेश जाधव, दिपक वमने, भगवान उपाध्ये, गोपाल लिंगायत, कलीम कुरेशी, रितेश एडके, सुधीर वायखिंडे, रावसाहेब आल्हात, नजीर शेख, रज्जाक पठाण, विलास लबडे, सागर भागवत, अशोक जगधने, सुनील साबळे, सुरेश ठुबे, रितेश चव्हाणके, विशाल साळवे, राजेश जोंधळे, योगेश गायकवाड, सनी मंडलिक, सागर दुपाटी, मनीष पंचमुख यांच्यासह आदींच्या निवेदनावर सह्या आहेत.

# रस्त्यासह इतर प्रश्नांसाठी गणेश झगरे यांचे अन्नत्याग उपोषण लेखी आश्वासनानंतर मागे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** तालुक्यातील मक्तापूर येथील ग्रामपंचायतसमोर असलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकामध्ये मराठा सुकाणू समितीचे प्रदेशाध्यक्ष गणेश झगरे यांनी मक्तापुर ते नेवासा फाटा रस्त्याच्या प्रश्नांवर उपोषण केले. वेळोवेळी निवेदने देऊन ही प्रशासन दखल घेत नसल्याचा निषेधार्थ गणेश झगरे यांनी एक दिवसाचे अन्नत्याग उपोषण केले. गटविकास अधिकारी यांनी दिलेल्या लेखी आश्वासनंतर उपोषण मागे घेण्यात आले.

सदर उपोषण प्रसंगी ना. शंकरराव गडाख व खा. भाऊसाहेब वाकचौरे यांनी स्वतः फोन करून उपोषण सोडण्याची विनंती केली तर शिवसेनेच्या ठाकरे गटाचे जिल्हा उपप्रमुख रामदासजी गोल्हार व मक्तापूर गावाचे तंटामुक्ती अध्यक्ष दत्ताभाऊ कांगुणे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेवासा तालुकाध्यक्ष मच्छिंद्र म्हस्के, ग्रामसेवक दत्तात्रय गर्जे यांच्या हस्ते लेखी पत्र देऊन उपोषण सोडण्यात आले.

या एकदिवसीय उपोषणाप्रसंगी गणेश झगरे यांनी गेले अनेक वर्षापासून नेवासा फाटा ते मक्तापुर रस्त्याला मोठमोठे खड्डे पडल्याने नागरिकांना येणे जाण्याचा अडथळा होत आहे. तसेच जि प प्राथ. शाळेतील मुलांचे शौचालय खराब झाले आहे. तसेच गावामध्ये अनेक प्रधानमंत्री, रमाई व शबरी आवास योजना घरकुलांचे पैसे थांबले आहेत व जलजीवन मिशन अंतर्गत पाणी योजना तीन कोटी रुपये या योजनेचे ९० टक्के काम पुर्ण झाले असुन उर्वरित दहा टक्के काम अपूर्ण आहे ते काम तत्काळ पुर्ण होणे, यासाठी ग्रामपंचायत कार्यालयाला पूर्णवेळ प्रशासक नेमणे अशा अनेक समस्या पुर्ण होण्यासाठी उपोषण केले होते.




सदरच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाची ताकद लावणार लावू अशी ग्वाही शिवसेना नेते रामदास गोल्हार यांनी यावेळी बोलताना दिली तर मक्तापुर गावचे तंटामुक्ती अध्यक्ष दत्ताभाऊ कांगुणे यांनी ज्यावेळी मक्तापुर ग्रामपंचायतची निवडणूक होईल त्यावेळेस सगळे पूर्ण काम पूर्ण करून देऊ असे आश्वासन दिले.सदर उपोषण प्रसंगी माजी सरपंच बन्यामिन साळवे, पुनमचंद साळवे, विराट प्रतिसादचे सागर सरोदे, टिल्लू गव्हाणे, जोयल साळवे, निवृत्ती सातपुते, अविनाश हिवाळे, योसेफ चव्हाण, माणिक साळवे, साहेबराव साळवे, सतीश बर्डे, अविनाश गोरक्षनाथ बर्डे, लहानू नवघरे, आजिनाथ झगरे, प्रदीप बर्डे, विलास साळवे, अनिल हिवाळे, मयूर साळवे, सुनील गोरे, रावसाहेब मगर,फिलिप साळवे,कचरू जामदार, लक्ष्मण बर्डे, हरिभाऊ कोळेकर, मच्छिंद्र जामदार, पत्रकार बादल परदेशी, जेष्ठ पत्रकार आबासाहेब शिरसाठ, बाळासाहेब देवखिळे, योगेश गायकवाड, अमोल भागवत, अशोक साळवे, सुनील साळवे, गोरक्षनाथ नवघरे, सनी साळवे, रितेश साळवे, जोबदास साळवे, आकाश बनकर, अनिल साळवे, आजिनाथ जामदार, राहुल जामदार, शिवाजी बर्डे आदी मक्तापूर ग्रामस्थ या एकदिवसीय अन्नत्याग उपोषणाला उपस्थित होते.

# घोडेगाव चौफुलीवर बसस्थानक शेड उभारण्याची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई :** नेवासा तालुक्यातील घोडेगाव चौफुलीवर एसटी बसेस थांबत असताना प्रवाशांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याने येथे छोटे बसस्थानक शेड उभारावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष तथा प्रगतिशील शेतकरी जालिंदर येळवंडे यांनी केली आहे. घोडेगाव चौफुलीवर अनेक वर्षांपासून एसटी महामंडळाच्या बसेस थांबतात. मात्र, प्रवाशांना बसण्यासाठी अथवा बसची प्रतीक्षा करण्यासाठी सुरक्षित जागा उपलब्ध नाही. चौफुलीवर मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ असल्याने रस्त्यावरच बसमध्ये चढताना-उतरताना प्रवाशांना मोठी कसरत करावी लागते. त्यामुळे अपघाताची शक्यता निर्माण झाली असून, जीवितहानी होण्याचा धोका असल्याचे येळवंडे यांनी म्हटले आहे.

या चौफुलीवर दररोज हजारो प्रवाशांची ये-जा होत असून महिला, ज्येष्ठ नागरिक व विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय होत आहे. त्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने येथे तातडीने छोटे बसस्थानक शेड उभारावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गांभीर्याने घेऊन बसस्थानक शेड उभारावे. मागणीची दखल न घेतल्यास राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने आंदोलन करण्यात येईल, असा इशारा जालिंदर येळवंडे यांनी दिला.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

## द • ख • ल

### श्रावणी सोमवारनिमित्त निंभेरे येथे भव्य कीर्तन महोत्सव

**झरेकाठी** : श्रावण महिन्याचे औचित्य साधून श्री महादेव काशी विश्वेश्वर व साईबाबा मंदिर, श्रीक्षेत्र निंभेरे, तुळापूर येथे श्रावणी सोमवारनिमित्त भव्य कीर्तन महोत्सव व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. श्रावणातील चारही सोमवार विविध नामवंत कीर्तनकारांच्या कीर्तनाने मंदिर परिसर भक्तिमय होणार आहे. महोत्सवाची सुरुवात दि. १७ ऑगस्ट रोजी ह.भ.प. राजेश महाराज साबळे यांच्या कीर्तनाने झाली. दि. २४ ऑगस्ट रोजी ह.भ.प. सुनील महाराज सोनवणे, दि. ३१ ऑगस्ट रोजी ह.भ.प. मनोहर महाराज सिनारे यांचे कीर्तन होणार आहे. तर दि. ७ सप्टेंबर रोजी ह.भ.प. प्रकाश महाराज आव्हाड (देरेवाडी) यांच्या काल्याच्या कीर्तनाने महोत्सवाची सांगता होणार आहे. प्रत्येक सोमवारी सकाळी ६.३० वाजता महादेवांचा अभिषेक, ७.३० वाजता महाआरती व त्यानंतर खिचडी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी ७ ते ९ या वेळेत कीर्तनाचा कार्यक्रम होणार आहे. भाविकांनी कुटुंबासह मोठ्या संख्येने उपस्थित राहून कीर्तन व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री महादेव काशी विश्वेश्वर भक्त परिवार व समस्त ग्रामस्थांनी केले आहे.

### श्रीमती जानकीबाई आदिक माध्यमिक विद्यालयात स्वातंत्र्यदिन उत्साहात



**श्रीरामपूर** : अशोकनगर येथील खा. गोविंदराव आदिक ग्रामीण शिक्षण संस्था संचलित श्रीमती जानकीबाई आदिक माध्यमिक विद्यालयात ८० वा स्वातंत्र्यदिन उत्साहपूर्ण व देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आल्याची माहिती दिलीप वैराळ यांनी एका पत्रकाद्वारे दिली. स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून विद्यालय परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेशही देण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे अकील पटेल व शेरबानो पटेल यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली. त्यानंतर प्रमुख पाहुणे, पालक व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमास माजी सरपंच रवींद्र पवार, माजी प्राचार्य नामदेवराव राऊत, माजी क्रीडाशिक्षक विष्णुपंत राऊत, म्हाळसाकांत राऊत, शरीफ शेख, कैलास मापारी, भोलेनाथ खंडिझोड, समीर शेख, मंगल गायधने, सूर्यवंशी, जाधव, मुख्याध्यापक, शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेतर सेवक, विद्यार्थी तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हा सरचिटणिसपदी चव्हाण



**पुणतांबा** : राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार) अहिल्या नगर जिल्हा सरचिटणीसपदी येथील बाळासाहेब निवृत्ती चव्हाण यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तशा आशयाचे लेखी पत्र त्यांना प्रदेश अध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी दिले. चव्हाण राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेपासूनच पक्षाचे सक्रिय सदस्य होते. राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे राहाता तालुका अध्यक्ष म्हणून त्यांनी ९ वर्ष काम केले. तसेच जिल्हा युवक काँग्रेसचे सरचिटणीस म्हणूनही त्यांनी ३ वर्ष काम पाहिले. सध्या राष्ट्रवादी किसान सेलचे कार्याध्यक्ष म्हणून ते कार्यरत होते. खंडकरी शेतकरी चळवळीत त्यांनी पुढाकार घेतला होता. पुणतांबा येथे १जून२०१७मध्ये झालेल्या शेतकरी संपाचे त्यांनी नेतृत्व केले होते. ७ मे२००४मध्ये शिर्डी येथे व्यापाऱ्यांच्या आंदोलनात त्यांनी हिरारीने भाग घेतला होता. त्यांना १५ दिवस नाशिक येथील कारागृहात तुरुंगवास झाला होता. पुणतांबा येथे सर्व रेल्वेगाडयांना थांबा मिळावा म्हणून १५ ऑगष्ट २०२४ रोजी झालेल्या रेल रोको आंदोलनात ते सक्रिय सहभागी होते. निवडीबद्दल त्यांचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, खा. सुप्रिया सुळे, आ.. रोहित पवार, आ. जयंत पाटील, प्रदेश उपाध्यक्ष दादाभाऊ कळमकर, जिल्हा अध्यक्ष संदिप वर्पे, रावसाहेब म्हस्के, राजेंद्र कोठारी, बबनराव भुसारी यांच्यासह अनेकांनी अभिनंदन केले.

### श्रावण मासानिमित्त लोणी ते त्र्यंबकेश्वर पायी दिंडी

**प्रवरानगर** : श्रावण मासानिमित्त श्री क्षेत्र वरदविनायक सेवाधाम, लोणी, ता. राहाता ते श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन दि. १ ते ६ सप्टेंबरदरम्यान करण्यात आले आहे. दिंडीचे मार्गदर्शक व वरदविनायक सेवाधामचे संस्थापक महंत उद्धव महाराज मंडलिक (नेवासेकर) यांनी ही माहिती दिली. दि. १ सप्टेंबर रोजी सकाळी ७ वाजता लोणी येथून दिंडीचे प्रस्थान होईल. दि. ६ सप्टेंबर रोजी पहाटे ४ वाजता ब्रह्मगिरी प्रदक्षिणा करण्यात येणार असून, दुपारी १२ वाजता काल्याच्या कीर्तनाने सांगता होईल. दिंडीतील भाविकांसाठी चहा, नाश्ता, भोजन व निवासाची व्यवस्था करण्यात आली आहे. भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन महंत उद्धव महाराज मंडलिक यांनी केले.

# अहिल्यानगर-मनमाड महामार्गाच्या दुरुस्तीसाठी वकिलांची फौज भर पावसात रस्त्यावर



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : अहिल्यानगर - मनमाड महामार्गाच्या झालेल्या दुरावस्थेमुळे काल नगर - मनमाड मार्गावर राहुरी शहरात नगर - मनमाड महामार्गावर असलेल्या ग्रीन हॉटेल चौकात राहुरी न्यायालयातील वकिलांनी भर पावसात रास्ता रोको आंदोलन करून या रस्ता दुरावस्थेतेचा निषेध केला आहे. यावेळी या आंदोलनात वकील बांधवासह राहुरीतील अनेक संघटना व नागरिक सहभागी झाले होते.गेल्या अनेक वर्षांपासून या महामार्गाची अवस्था अत्यंत दयनीय असून, रस्त्याचे काम संथ गतीने सुरू असल्याचा आरोप आंदोलक व वकिल संघटनेने केला आहे.

महामार्गावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले असून, नव्याने केलेल्या रस्त्यावरही पहिल्या पावसातच अनेक खड्डे पडल्याने झालेल्या कामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. खराब रस्त्यामुळे वाहनचालक व प्रवाशांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत असून, या मार्गावर अनेक अपघात होऊन जीवितहानी झाल्याचे आंदोलकांनी यावेळी सांगितले. महामार्गाचे काम तातडीने, दर्जेदार व टिकाऊ पद्धतीने पूर्ण करावे, संबंधित ठेकेदाराला आवश्यक ते आदेश द्यावेत तसेच कामाच्या गुणवत्तेची तपासणी करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

रस्त्याचे काम रखडल्यामुळे होणाऱ्या अपघातांमध्ये मृत्यू झाल्यास मृतांच्या वारसांना ५० लाख रुपये आर्थिक मदत, कायमस्वरूपी अपंगत्व आल्यास २५ लाख रुपये मदत आणि मृतांच्या कुटुंबातील पात्र सदस्यांना शासनाच्या नियमानुसार रोजगार देण्याची मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली. आंदोलनकर्त्यांच्या मागणीचे निवेदन राहुरीचे नायब तहसीलदार बाचकर यांनी स्वीकारले. दरम्यान महामार्गाचे काम लवकरात लवकर सुरू न झाल्यास आंदोलनाचे स्वरूप आणखी तीव्र करण्यात येणार असल्याचा इशारा वकील संघटनेने दिला आहे. या निवेदनावर ॲड. प्रवीण पागिरे ॲड. भागवत उर्हे, ॲड. प्रकाश संसारे, ॲड. महेश साठे, ॲड. आर डी बाचकर, ॲड. के. जी मुसमाडे, ॲड. एस के भंडारी, ॲड. एस बी विधाटे, ॲड. सुंदरबापू माने, ॲड. एल.बी. किनकर, ॲड. ऋषिकेश मोरे, ॲड. संदीप खपके, ॲड. के.टी. चितळकर, ॲड. अमोल डौले, ॲड.बी.एम. शिरसाट, ॲड. जी.पी. गाडे, ॲड. जी.डी. तनपुरे, ॲड. जी.पी. चोखर, ॲड. एम.बी देशमुख, ॲड. जी.डी. घावटे, ॲड. बी.डी. पवार, ॲड. कल्याणी पागीरे, ॲड. सविता गांधले, ॲड. अनिता तोडमल, ॲड. एस पी लहाने, ॲड. उज्वला थेरकर, आदींच्या सह्या आहेत सदरील आंदोलनाला किरण कडू, देवेंद्र लांबे व निलेश शिरसाठ यांनी पाठिंबा दिला आहे.

अराहुरी शहरात असलेल्या नगर मनमाड महामार्गावरील ग्रीन हॉटेल चौकात झालेल्या या आंदोलनामुळे काही काळ वाहतुक ठप्प झाल्याने वाहनांची दुतर्फा रांग लागली होती.

## आ. विठ्ठलराव लंघे यांनी सपत्नीक घेतले घृष्णेश्वर ज्योतिर्लिंगाचे दर्शन



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : पहिल्या श्रावणी सोमवारी आणि नागपंचमीच्या पावन पर्वानिमित्त नेवासा तालुक्याचे आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांनी पत्नी रत्नमालाताई लंघे पाटील यांच्या समवेत वेरूळ येथील श्री घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग मंदिरात जाऊन दर्शन घेतले. यावेळी आ. विठ्ठलराव लंघे व रत्नमालाताई लंघे यांच्या हस्ते वेदमंत्राच्या जयघोषात जलाअभिषेक व दुग्धाभिषेक घालण्यात आला.

यावेळी आ. विठ्ठलराव लंघे यांनी नेवासा तालुक्यातील शेतकरी राजा सुखी होऊन भरपूर पावसासाठी सर्वांच्या सुख, समृद्धी आणि आरोग्यासाठी भगवान श्री घृष्णेश्वरांच्या प्रार्थना केली. यावेळी घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग देवस्थानचे अध्यक्ष कुणाल दांडगे यांनी आ. विठ्ठलराव लंघे यांचे स्वागत करत त्यांचा सपत्नीक सत्कार करून सन्मान केला.

याप्रसंगी खुलताबाद शिवसेना तालुकाप्रमुख निखिल चव्हाण, प्रकाशबापू चव्हाण, अनिल लंघे, आमदार लंघे यांचे स्वीय सहायक विजय पवार उपस्थित होते.

# रस्त्यांचे कॉँक्रिटिकरण करा

## सरपंच मुरकुटे यांचे मंत्री शिवेंद्र राजे यांना निवेदन



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान** : तालुक्यातील कमालपूर ते भोकर आणि घुमनदेव ते टाकळीभानला जोडणाऱ्या या दोन एकुण बारा किलोमीटर अंतराच्या रस्त्यांच्या कॉँक्रिटीकरणाची मागणी श्रीरामपूर तालुक्यातील कमालपूरचे सरपंच सचिन मुरकुटे यांनी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्र राजे भोसले यांच्याकडे प्रत्यक्ष भेटून केली आहे. या संदर्भात मुरकुटे यांनी पन्हाळगड येथे मंत्री भोसले यांना निवेदन दिले.

त्यात त्यांनी कमालपूर येथे महानुभाव पंथीयांचे श्री. चक्रधर स्वामी मंदिर आणि शिख धर्मियांचे डोमेग्राम पवित्र गुरुद्वारा ही देशात प्रसिद्ध तीर्थक्षेत्रे असल्याने येथे वर्षभर लाखोंच्या संख्येने भाविकांची वर्दळ असते. मात्र या रस्त्यांची दुरावस्था झाल्याने भाविकांची मोठी गैरसोय होते. तसेच अनेकदा अपघातही होतात असे निवेदनात म्हटले आहे. कमालपूर-डोमेग्राम हे तीर्थक्षेत्र मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्राच्या तसेच अहिल्यानगर आणि संभाजीनगर या दोन्ही जिल्ह्याच्या सीमेवर आहे. श्रीरामपूर तालुक्यातील कमालपूर, टाकळीभान, घुमनदेव, भोकर, वैजापूर तालुक्यातील चेंडूफळ, बाजाठाण, देवगाव शनी या गावांनीही ठराव करुन रस्त्याच्या कॉँक्रिटीकरणाची मागणी केल्याची माहितीही दिलेल्या निवेदनाद्वारे ना. भोसले यांच्या निदर्शनास आणुन दिली आहे. त्यावर ना. शिवेंद्र राजे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना या संदर्भात कार्यवाही करण्याच्या सुचना दिल्याचेही सरपंच मुरकुटे यांनी सांगितले. यावेळी हरिहर पांडे, अनिल बोराडे, प्रणव कारंजकर उपस्थित होते.

# अजून किती बळी जाण्याची वाट पाहणार?

## आ.काळेंचा मुख्याधिकाऱ्यांना उद्विग्न सवाल | मोकाट जनावरांवर कारवाईच्या सूचना



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** : कोपरगाव शहरातील मोकाट जनावरांचा वाढता वावर नागरिकांच्या जीवितासाठी गंभीर धोका ठरत असल्याने आमदार आशुतोष काळे यांनी सोमवारी (दि. १७) कोपरगाव नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अजित निकत यांच्यासमवेत बैठक घेतली. यावेळी मोकाट जनावरांच्या प्रश्नावर तीव्र चिंता व्यक्त करत, अजून किती बळी जाण्याची वाट पाहणार? असा उद्विग्न सवाल आमदार काळे यांनी केला. शहरातील प्रमुख रस्ते, चौक, बाजारपेठा तसेच शाळा-महाविद्यालयांच्या परिसरात मोकाट जनावरांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. रस्त्यांवर ठाण मांडून बसणारी जनावरे, अचानक वाहनांसमोर येणारे कळप आणि त्यामुळे निर्माण होणारे वाहतुकीचे अडथळे यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे. आतापर्यंत मोकाट जनावरांमुळे दोन नागरिकांना जीव गमवावा लागला असून अनेक जण जखमी झाल्याचे आमदार काळे यांनी निदर्शनास आणून दिले. दुर्घटना घडल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा त्या टाळण्यासाठी प्रशासनाने तत्काळ प्रभावी पावले उचलणे आवश्यक आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

संवेदनशील ठिकाणे, प्रमुख रस्ते, बाजारपेठा व शैक्षणिक परिसरात विशेष लक्ष देऊन मोकाट जनावरांचा बंदोबस्त करावा तसेच या समस्येवर ठोस व कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशा सूचना त्यांनी मुख्याधिकारी अजित निकत यांना दिल्या.

# मुळा कालव्यातून पाणी सोडून वांबोरी चारी व मुसळवाडी तलाव भरा

## रवींद्र मोरे यांचे तहसीलदार डॉ. अमित पवार यांना निवेदन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : अहिल्यानगर जिल्ह्यात पावसाचे प्रमाण कमी असल्याने शेतकऱ्यांची उभी पिके पाण्याअभावी धोक्यात आली आहेत. त्यामुळे मुळा धरणाच्या डाव्या व उजव्या कालव्याचे रोटेशन तातडीने सुरू करून वांबोरी चारीला पाणी सोडावे तसेच मुसळवाडी तलाव पूर्ण क्षमतेने भरून द्यावा, अशी मागणी शिंदे शिवसेनेचे प्रदेश उपाध्यक्ष रवींद्र मोरे यांनी केली आहे. याबाबत त्यांनी तहसीलदार डॉ. अमित पवार यांना निवेदन दिले. राहुरी, नेवासा, शेवगाव व पाथर्डी तालुक्यांमध्ये पावसाअभावी पिकांना पाण्याची गरज निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांनी मोठ्या कष्टाने व खर्च करून पिकांची लागवड केली असून, वेळेवर पाणी न मिळाल्यास मोठे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मुळा धरणातील उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करून कालव्यांचे रोटेशन सुरू करावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. मुळा धरण भरण्याच्या उंबरठ्यावर असल्याने उपलब्ध पाण्याचे नियोजन करून शेतकऱ्यांना दिलासा देता येईल. पाणी उपलब्ध असताना त्याचा योग्य वापर न झाल्यास हातातोंडाशी आलेली पिके वाया जाण्याची भीती आहे. त्यामुळे जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना तातडीने सूचना देऊन डावा-उजवा कालवा सुरू करावा, वांबोरी चारीला पाणी सोडावे आणि मुसळवाडी तलाव भरून द्यावा, अशी मागणी मोरे यांनी केली. निवेदनावर प्रकाश देठे, बाळासाहेब जाधव, राजेंद्र लोंढे, वसंत कदम, सुरेश तोडमल, किशोर शेळके, नारायण खाडे यांच्यासह शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.


### जाहिर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांकः/जन्म-मृत्यु/एसआर/८७/२०२६
नेवासा दिनांक. २१/०७/२०२६

अर्जदार श्री/श्रीम- शकिला बापु पठाण, रा.सोनई, ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन श्री/श्रीम. कु. शकिला बापु पठाण, रा.सोनई, ता.नेवासा, यांचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे.

सदरच्या अर्जात खालील प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.१, जन्म नोंद घेण्यात येणा-या व्यक्तीचे नाव-शकिला बापु पठाण, गावाचे नाव-सोनई, जन्म दिनांक-०१/०१/१९६२

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी ज़न्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहलिसदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, मौजे ब्राम्हणी, ता. राहुरी, जि. अहिल्यानगर येथील खालील परिशिष्टात वर्णन केलेली चतुःसिमा पुर्वक मिळकत मालक सुभाष शिवराम साठे यांचे नावे असुन सदरची मिळकत त्यांचे प्रत्यक्ष कब्जात असल्याने त्यांनी सदर मिळकत आमचे आशिल यांना कायम खरेदी देण्याचे ठरवुन, आमचे आशिलाकडुन विसाराची रक्कम घेतलेली आहे. सदरची मिळकत पुर्णपणे निर्वेध, निजोखमी, बोजारहीत तसेच त्यावर कोणत्याही स्वरुपाचा वाद विषय प्रलंबित नसले बाबतचा पुर्ण भरवसा जमीनमालक यांनी आमचे आशिलास दिलेला आहे. तरी तमाम जनतेस कळविण्यात येते की, सदर मिळकतीबाबत कोणाचा कोणताही हक्क, हितसंबध, गहाण, दान, बोजा, तारण, लिज, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, जामीन, जप्ती, करारनामा, कुळ, जनरल मुखत्यारपत्र, विसारपावती, साठेखत, खरेदी दस्त अगर इतर कोणताही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबध असल्यास संबधीताने कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन ०५ (पाच) दिवसाचे आत आमचे खालील पत्त्यावर हरकती लेखी स्वरुपात नोंदवाव्यात. मुदतीत कोणाची कसलीही हरकत न आल्यास आमचे आशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील त्यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमचे आशिलावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट

जि. अहिल्यानगर, ता. राहुरी, पैकी मौजे ब्राम्हणी, ग्रामपंचायत हददीमधील खालील वर्णनाची शेतजमिन मिळकत

मिळकतीचे वर्णनः-

| गावाचे नाव | गट नंबर | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|
| | | हे-आर | रुपये | पैसे |
| ब्राम्हणी | २४६ | ०=२४<br>पो.ख. ०=०३ | ० | ५५ |

यासी चतुः सिमा रेकॉर्ड ऑफ राईट प्रमाणे-
पुर्व :-गट नंबर २४२, उत्तर :- गट नंबर २४२, पश्चिम :- गट नंबर २४३ व २४४, दक्षिण :- गट नंबर २४५, २४७, २४८
कळावे, हि जाहीर नोटीस दिली असे.
ता. १८/०८/२०२६

**ॲड. एस. एस. देशमुख**
**ॲडव्होकेट, राहुरी कोर्ट**
**ता. राहुरी जि.अ.नगर**
**मो.नं. ९८८१६७५५९२**


# १८ ते २० एचपी ट्रॅक्टरलाही अनुदान द्या

## महाडीबीटीचे निकष बदलण्याची मागणी



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : महाडीबीटी पोर्टलद्वारे कृषी यांत्रिकीकरण योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या ट्रॅक्टर अनुदानाच्या अश्वशक्ती (एचपी) पात्रता निकषांमध्ये सुधारणा करून १८ ते २० एचपी श्रेणीतील ट्रॅक्टरलाही अनुदानासाठी पात्र ठरवावे, अशी मागणी युवा बागायतदार वैभव नाईकवाडी यांच्यासह शेतकरी व युवासेनेच्या पदाधिकाऱ्यांनी आमदार अमोल खताळ व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली.

सध्या ३५ एचपीपेक्षा अधिक अश्वशक्तीच्या ट्रॅक्टरसाठी असलेल्या निकषामुळे अनेक अल्पभूधारक व मध्यम भूधारक शेतकरी योजनेच्या लाभापासून वंचित राहत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. कमी क्षेत्र असलेल्या शेतकऱ्यांसाठी १८ ते २० एचपीचे ट्रॅक्टर अधिक उपयुक्त व आर्थिकदृष्ट्या परवडणारे आहेत. तसेच त्यांचा देखभाल व वापराचा खर्च तुलनेने कमी असतो. शासनाने सध्याच्या पात्रता निकषांचा पुनर्विचार करून १८ ते २० एचपी ट्रॅक्टरला अनुदान द्यावे किंवा अश्वशक्तीनुसार स्वतंत्र अनुदान श्रेणी निश्चित करावी, अशी मागणी करण्यात आली. याबाबत कृषिमंत्री व वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून शासनस्तरावर पाठपुरावा करण्याची मागणी आमदार खताळ यांच्याकडे करण्यात आली.

यावेळी युवासेना उपजिल्हाप्रमुख सौरभ देशमुख, तालुकाप्रमुख सुशिल शेवाळे, शहरप्रमुख सार्थक शेवाळे, चेतन उदार, मानस साबळे आदी उपस्थित होते.


### जाहिर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांकः/जन्म-मृत्यु/एसआर/२६३/२०२५
नेवासा दिनांक. १३/०८/२०२६

अर्जदार श्री/श्रीम- अफसाणा इब्राहिम सय्यद, रा.नेवासा खुर्द, ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन श्री/श्रीम. कु. अफसाणा इब्राहिम सय्यद, रा.नेवासा खुर्द, ता. नेवासा यांचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे.

सदरच्या अर्जात खालील प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.१, जन्म नोंद घेण्यात येणा-या व्यक्तीचे नाव-अफसाणा इब्राहिम सय्यद, गावाचे नाव-नेवासा खुर्द, जन्म दिनांक-०१/०६/१९६९

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी ज़न्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहलिसदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**



### जाहिर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांकः/जन्म-मृत्यु/एसआर/२६/२०२६
नेवासा दिनांक. ०३/०२/२०२६

अर्जदार श्री/श्रीम- तुषार भाऊसाहेब शिंदे, रा.मंगळापूर, ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन कै.ठकुबाई दामोदर शिंदे, रा.मंगळापूर, ता.नेवासा, यांचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये मृत्यु नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे.

सदरच्या अर्जात खालील प्रमाणे मृत्यु नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.१, मृत्यु नोंद घेण्यात येणा-या व्यक्तीचे नाव-कै. ठकुबाई दामोदर शिंदे, गावाचे नाव-मंगळापूर, मृत्यु दिनांक-२६/०६/२००५

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये मृत्यु नोंद गावी ज़न्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहलिसदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

# धीरज परदेशी हत्याकांड प्रकरण : आ. संग्राम जगतापांची नार्को टेस्ट करा

## ठाकरे शिवसेनेची मागणी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** धीरज परदेशी हत्याकांडाच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगरचे राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापले असून, या प्रकरणातील आरोपींचे पाकिस्तान आणि फिलिस्तीनशी कथित संबंध, पोलिस तपासाची दिशा, हिंदूंच्या घरांवर कथित अतिक्रमण, तसेच धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या घटनांबाबत सत्ताधारी आमदारांनी केलेल्या आरोपांवरून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आक्रमक झाली आहे. या पार्श्वभूमीवर पक्षाचे अहिल्यानगर महानगर प्रमुख किरण काळे यांनी मंगळवारी मुंबईतील प्रेस क्लब येथे पत्रकार परिषद घेत राज्य सरकार आणि पोलिस यंत्रणेकडे विविध मागण्या केल्या. परदेशी हत्याकांड प्रकरणात संग्राम जगतापांची नार्को टेस्ट करण्याची मागणी यावेळी काळे यांनी केली.

काळे यांनी सांगितले की, ७ ऑगस्ट रोजी धीरज परदेशी यांच्यावर हल्ला झाला, ९ ऑगस्ट रोजी त्यांचे निधन झाले आणि १० ऑगस्ट रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले. या घटनेनंतर १० ऑगस्ट रोजी जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार संग्राम जगताप यांच्या आवाहनावरून रास्ता रोको आंदोलनाचे आयोजन करण्यात आले होते. मात्र, प्रत्यक्षात आंदोलनाऐवजी तेथे राजकीय सभा झाल्याचा आरोप त्यांनी केला. या सभेत आ. संग्राम जगताप आणि आ. अक्षय कर्डिले यांनी केलेल्या वक्तव्यांवरही काळे यांनी तीव्र टीका केली.

काळे यांनी आरोप केला की, या सभेच्या माध्यमातून धार्मिक तेढ निर्माण होण्याची परिस्थिती निर्माण झाली होती. मात्र, अहिल्यानगर पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात ठेवत संभाव्य अनुचित घटना टाळल्याबद्दल त्यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुमका, अतिरिक्त पोलीस अधीक्षक,



शहर डीवायएसपी आणि संपूर्ण पोलिस दलाचे कौतुक केले. अहिल्यानगर पेटण्यापासून वाचविण्याचे काम पोलिसांनी केले, असे काळे म्हणाले. जगताप यांनी पोलिसांवर गंभीर आरोप केले असताना दुसरीकडे ठाकरे शिवसेने मात्र पोलिसांच्या भूमिकेचे समर्थन केल्याचे यावेळी पाहायला मिळाले.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या चिथावणी वरून जर त्या दिवशी काही अनुचित प्रकार घडला असता तर निष्पाप हिंदू मुलांवर दंगलीचे गुन्हे दाखल झाले असते. त्यांची करियर्स उध्वस्त झाली असती. यापूर्वी एसपी ऑफिसला हल्ला प्रकरणामध्ये २०० हून अधिक हिंदू आणि काही मुस्लिम व्यक्तींना आरोपी करण्यात आले आहे. मात्र त्या प्रकरणामध्ये स्वतः जगताप हे मात्र आरोपी नाहीत. त्यामुळे हिंदुत्वाची बंदूक निष्पाप तरुणांच्या खांद्यावर ठेवून कोणी आपली राजकीय पोळी भाजू नये असे काळे म्हणाले.

**पाकिस्तान-फिलिस्तीन कनेक्शनच्या आरोपांची चौकशी करण्याची मागणी**

धीरज परदेशी हत्याकांडातील आरोपींचे पाकिस्तान किंवा फिलिस्तीनशी संबंध असल्याचे आरोप आ. संग्राम जगताप आणि संग्राम भंडारे यांनी केल्याचा दावा करत काळे यांनी या आरोपांना गंभीर स्वरूपाचे असल्याचे म्हटले. जर हे आरोप खरे असतील, तर राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने त्याची सखोल चौकशी होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. या पार्श्वभूमीवर संबंधित नेत्यांना पोलिसांनी नोटीस बजावून त्यांचे जबाब नोंदवावेत, त्यांच्याकडील कथित पुरावे ताब्यात घ्यावेत आणि आवश्यक असल्यास पुढील तपास राष्ट्रीय तपास संस्था कडे सोपवावा, अशी मागणी मुंबईत राज्याच्या पोलीस महासंचालकांकडे काळे यांनी केली आहे.

# द•ख•ल

## वैजवनाथ विद्यालयात स्वातंत्र्य दिन साजरा

**करंजी :** वैजु बाभुळगाव ता. पाथर्डी येथील वैजनाथ माध्यमिक विद्यालयांमध्ये स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी इयत्ता दहावी मध्ये प्रथम आलेल्या विद्यार्थिनी कु. साक्षी सचिन जरे या विद्यार्थिनीच्या हस्ते स्वातंत्र्य दिनाचे ध्वजारोहण करण्यात आले. सन २५ / २६ या शैक्षणिक वर्षांमधील इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. यावेळी संस्थेचे सर्व पदाधिकारी अध्यक्ष विठ्ठल गुंजाळ, दत्तात्रय गुंजाळ, शिवनारायण घोरपडे, संजय डेंगळे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्वातंत्र्यदिनी गुणवंत विद्यार्थिनीचा सायकल देऊन गौरव



**श्रीगोंदा :** भारताच्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून मढेवडगाव येथील उंडेमळा जिल्हा परिषद शाळेतील गुणवंत विद्यार्थिनी अस्मिता प्रदीप उंडे हिचा अनोख्या पद्धतीने गौरव करण्यात आला. प्रज्ञा शोध परीक्षेच्या गुणवत्ता यादीत स्थान मिळवल्याबद्दल प्रहार दिव्यांग अपंग संघटनेचे तालुकाध्यक्ष राजेंद्र पोकळे यांनी अस्मितेला सायकल भेट देत तिच्या शैक्षणिक यशाचे कौतुक केले. कार्यक्रमास सुभाष शिंदे, प्रमोद शिंदे, अमोल गाढवे, गोरखराव मांडे, योगेश उंडे, योगेश शिंदे, बाबासाहेब फापाळे, मनोज सुपेकर, नवनाथ उंडे, प्रहारचे सुरेश गलांडे, युवानेते संग्राम शिंदे, निळकंठ उंडे तसेच महाराजा शिंदे महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. प्रदीप उंडे, संतोष इंगावले आदी उपस्थित होते. कार्यक्रमास डॉ. अरविंद उंडे, माणिकराव मांडे, भरत शिंदे, सुनील उंडे, महेश शिंदे, संजय शिंदे, जगदेव उंडे, भाऊसाहेब शिंदे, अनिल थोरात, पांडुरंग उंडे, खंडू उंडे, सचिन गिरे, गणेश शिंदे, सोमनाथ खराडे, स्वप्निल वाबळे, प्रमोद वाबळे, पांडुरंग ढेपे, सुहास मिसाळ, दिलीप नेताम, श्रद्धा गायकवाड, सोनाली उंडे, निता मांडे, कल्पना उंडे, प्रज्ञा शिंदे, प्राजक्ता उंडे, रोहिणी वाबळे, शितल शिंदे, वैशाली शिंदे, सविता मांडे, सुवर्णा शिंदे, प्राजक्ता शिंदे, सीमा उंडे, सुजाता थोरात, वर्षा उंडे, मंगल उंडे, सुनिता कार्ले, मंदा मांडे, सुमन उंडे, लंका उंडे, चंदाकाकी उंडे, कमल शिंदे, रतन शिंदे, सुलोचना मांडे, सुनिता मांडे, सारिका वाघमारे, प्रियंका शिंदे, तृप्ती शिंदे, श्रद्धा उंडे आदी उपस्थित होत्या.

## सुरेश चंद्रकांत माळी यांना 'उत्कृष्ट सेवा पदक'

**अहिल्यानगर :** महाराष्ट्र पोलीस दलात २० वर्षे दीर्घकाळ कर्तव्यनिष्ठ, निष्कलंक आणि उल्लेखनीय सेवा बजावत आपल्या कार्याची वेगळी छाप उमटविणारे सुरेश चंद्रकांत माळी यांना यंदाच्या स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने 'उत्कृष्ट सेवा पदक' जाहीर करण्यात आले आहे.



महाराष्ट्र पोलीस दलातील अधिकारी व अंमलदारांच्या २० वर्षांच्या दीर्घकालीन गुणवत्तापूर्ण सेवेला गौरविणाऱ्या या प्रतिष्ठेच्या सन्मानात सुरेश चंद्रकांत माळी यांचा समावेश झाल्याने त्यांच्या प्रदीर्घ पोलीस सेवेला राज्यस्तरावर मानाची पावती मिळाली आहे. 'उत्कृष्ट सेवा पदक' हा केवळ एक पुरस्कार नसून, २० वर्षे प्रामाणिकपणे आणि समर्पित भावनेने बजावलेल्या पोलीस सेवेचा गौरव आहे. त्यामुळे सुरेश चंद्रकांत माळी यांच्या नावाची या प्रतिष्ठेच्या सन्मानासाठी झालेली निवड त्यांच्या सेवाकार्यातील महत्त्वाचा टप्पा ठरली आहे. स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर मिळालेला हा बहुमान त्यांच्या पोलीस सेवेला आणखी उजाळा देणारा ठरला असून, त्यांच्या सहकाऱ्यांसह परिसरातूनही त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## अहमदनगर उर्दू हायस्कूल व मिसगर ज्युनिअर कॉलेजमध्ये स्वातंत्र्यदिन साजरा



**अहिल्यानगर :** नागोरी मुस्लिम मिसगर जमात ट्रस्ट संचलित अहमदनगर उर्दू प्रायमरी स्कूल, अहमदनगर उर्दू हायस्कूल व मिसगर ज्युनिअर कॉलेज तसेच एम्स इंग्लिश मीडियम स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्यदिन उत्साहपूर्ण आणि देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. मिसगर लायब्ररी परिसरात आयोजित या कार्यक्रमास विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. सईद सोलापुरे आणि सोहेल हनीफ उपस्थित होते. तसेच नागोरी मुस्लिम मिसगर जमात ट्रस्टचे विश्वस्त वाजिद जावेद खान व इफ्तिखार अकील अहमद खान यांची विशेष उपस्थिती लाभली. ध्वजारोहणानंतर प्रमुख पाहुणे प्रा. सईद सोलापुरे यांनी स्वातंत्र्यदिनाचे महत्त्व विशद करताना देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या शहीदांच्या त्याग व बलिदानाचे स्मरण केले.

# प्रभुवाडगावातील अन्नत्याग उपोषण तिसऱ्या दिवशीही सुरू

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**हातगाव :** शेवगाव तालुक्यातील प्रभुवाडगाव येथील सामाजिक कार्यकर्ते अशोक माणिक ढाकणे यांनी ठाकूर पिंपळगाव ते खडका - मडका - पैठण मार्गाच्या कामासाठी सोमवार रोजी सुरू केलेले अन्नत्याग उपोषण तिसऱ्या दिवशीही सुरू ठेवले असून जो पर्यंत भूमिअभिलेखचे अधिकारी प्रत्यक्ष येऊन जात नाहीत तो पर्यंत उपोषण सुरूच ठेवण्यात येईल अशी माहिती स्वतः उपोषणकर्ते अशोक ढाकणे यांनी दिली आहे. गावातीलच श्री प्रभू स्वामी मंदिरात सुरू केलेल्या या उपोषणकर्ते ढाकणे यांची काल मंगळवार रोजी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचे उपअभियंता वसंत बडे ,कनिष्ठ अभियंता संतोष पवार व स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक रुपेश गिरम ,तहसील कार्यालयाचे मुंगी येथील सर्कल विष्णू खेडकर ग्रामहसूल अधिकारी प्रशांत ढाकणे यांचेसह नव्यानेच हजर झालेले गटविकास अधिकारी महेश दहिफळे,विस्तार अधिकारी दादासाहेब शेळके,कक्ष अधिकारी श्रीराम चव्हाण,ग्रामसेवक रविंद्र वाबळे यांनी समक्ष भेट घेऊन उपोषणापासून परावृत्त होण्याबाबतचे लेखी पत्र दिले असून जो पर्यंत भूमि अभिलेखविभागाचे अधिकारी येत नाहीत आमच्या गंभीर प्रश्नाची दखल घेत नाही वत तो पर्यंत उपोषण सुरू ठेवण्याचा निर्णय उपोषणकर्ते ढाकणे यांनी घेतला असल्याने दुसऱ्या दिवशीही उपोषण सुरूच राहिले आहे.




ग्रामसडक योजनेच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, २७ ऑगस्ट रोजी शासकीय मोजणी करण्याबाबतचे भूमिअभिलेख कार्यालयाला आदेश दिले असून उपोषण स्थगित करावे तर तहसीलदार यांनी भूमिअभिलेख कार्यालयाला मोजणीबाबत पत्र दिले असून त्यांच्याकडून २७ ऑगस्ट रोजी मोजणी करण्यात येणार असल्याने उपोषण स्थगित करावे असे म्हटले आहे व गटविकास अधिकारी यांनी दिलेल्या पत्रात नमूद करण्यात आले आहे की, आपल्या निवेदनावरील विषय हा मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, सार्वजनिक बांधकाम विभाग,भूमिअभिलेख व महसूल विभाच्या अखत्यारीत येत असून आपण सुरू केलेले उपोषण स्थगित करावे असे म्हटले आहे.

# वनहक्क दावे फेटाळल्याने आदिवासी ग्रामस्थांची जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव

## वनजमिनीचे पट्टे नावावर करण्याची मागणी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** कोपरगाव तालुक्यातील संवत्सर येथील आदिवासी ग्रामस्थांच्या वनहक्क दाव्यांना शिर्डी येथील उपविभागीय वनहक्क समितीने अपात्र ठरवल्याने ग्रामस्थांनी आता जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव घेतली आहे. शबरी माता संस्थेच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते दीपक बर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली अर्जदार बारकू नामदेव गायकवाड यांच्यासह संवत्सर येथील आदिवासी ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी कार्यालयात अपील दाखल करून वडिलोपार्जित वनजमिनीचे पट्टे त्यांच्या नावावर करण्याची मागणी केली आहे.



मौजे संवत्सर येथील सर्वे नंबर १५१ मधील सुमारे १ हेक्टर क्षेत्राची जमीन पूर्वीपासून आपल्या वडिलोपार्जित कुटुंबीयांकडून कसली जात असून सदर जमीन आजही आपल्या ताब्यात असल्याचे ग्रामस्थांनी निवेदनात म्हटले आहे. अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासींच्या वनहक्कांची मान्यता अधिनियम २००६ व नियम २००८ अंतर्गत वनहक्क मिळण्यासाठी ग्रामस्थांनी दावा दाखल केला होता.

सदर दावा संवत्सर ग्रामसभेने मंजूर करून पुढील कार्यवाहीसाठी उपविभागीय वनहक्क समिती, शिर्डी यांच्याकडे पाठविला होता. मात्र, ग्रामसभा व वनहक्क समितीने मंजूर केलेला दावा उपविभागीय समितीने आदेशाद्वारे अपात्र ठरविला. हा निर्णय मान्य नसल्याने ग्रामस्थांनी संबंधित कायद्यातील तरतुदीनुसार जिल्हास्तरीय वनहक्क समिती, अहिल्यानगर यांच्याकडे अपील दाखल केले आहे.

या अपिलासोबत ग्रामस्थांनी आधारकार्ड, मतदान ओळखपत्र, रेशनकार्ड, जात प्रमाणपत्र, वंशावळ, जुने गट उतारे, १९९८ पासूनचे पीकपेरा नोंदी, वनहक्क समितीचे कागदपत्रे तसेच जमिनीवरील ताबा व लागवडीशी संबंधित विविध पुरावे सादर केले आहेत. आमच्या पूर्वजांपासून आम्ही या जमिनी कसत आलो आहोत. आमची पिढी संपत आली, मात्र आजपर्यंत जमिनीवर आमचे नाव आलेले नाही.

# कामगारांच्या विविध मागण्यांसाठी भारतीय मजदूर संघाचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा




प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** कामगार व कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे केंद्र व राज्य सरकारचे लक्ष वेधण्यासाठी भारतीय मजदूर संघ, अहिल्यानगर जिल्हा यांच्या वतीने (मागनी दिवस) निमित्त जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. कामगारांच्या मागण्यांबाबत शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

भारतीय मजदूर संघाच्या केंद्रीय कार्यसमितीच्या बैठकीत देशभरातील कामगार व कर्मचाऱ्यांच्या दीर्घकाळापासून प्रलंबित प्रश्नांसाठी १७ ऑगस्ट रोजी (मांगनी दिवस) आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार अहिल्यानगर जिल्ह्यातही विविध मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून निवेदन देण्यात आले.

यामध्ये एझड-९५ अंतर्गत किमान पेन्शन १ हजार रुपयांवरून ७ हजार ५०० रुपये प्रतिमाह करावी व त्याला तऊ- सोबत जोडावे, तसेच आयुष्मान भारत योजनेशी पेन्शनधारकांना जोडावे, अशी प्रमुख मागणी करण्यात आली. एझऋ, एडखउ व बोनसच्या गणनेसाठी वेतनाची कमाल मर्यादा दुप्पट करावी, जुनी पेन्शन योजना (जझड) पुन्हा लागू करावी, तसेच ग्रॅच्युइटीची गणना १५ दिवसांऐवजी ३० दिवसांच्या वेतनानुसार करावी, अशी मागणीही करण्यात आली.

सर्व कर्मचाऱ्यांना, कंत्राटी कर्मचाऱ्यांसह, 'समान कामासाठी समान वेतन' लागू करावे, जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किमतीनुसार किमान वेतनात वाढ करावी आणि अंगणवाडी, आशा, मिड-डे-मील, छक्व् आदी योजना कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ करावी, अशी मागणी संघटनेने केली आहे.



# स्वातंत्र्य दिनानिमित्त ८० हजारांचे शालेय साहित्य विद्यार्थ्यांना वाटप

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** नवनागापूर एमआयडीसी येथील श्री रेणुका माता देवस्थान ट्रस्टच्या वतीने ८० वा स्वातंत्र्य दिन शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत देऊन उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने ट्रस्टच्या वतीने तब्बल ८० हजार रुपये किमतीचे विविध शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. शिक्षण हा समाजाच्या प्रगतीचा पाया असून, विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साधने उपलब्ध करून देणे, या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात एमआयडीसी आठरे पाटील बालगृह येथे ध्वजारोहणाने झाली. श्री रेणुका माता देवस्थान ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष प्रभाकर भोर, उपाध्यक्ष साहेबराव भोर, सचिव दत्तात्रय विटेकर, खजिनदार एकनाथ वाघ, विश्वस्त राजू भोर, विष्णू भोर, किरण सप्रे, महेश सप्रे, सचिन कोतकर यांच्यासह शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, पालक, शिक्षक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमानंतर आठरे पाटील बालगृह, जिल्हा परिषद नवनागापूर शाळा, गजानन वसाहत आणि जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नागापूर येथील विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांना वह्या, पेन, पेन्सिल, दप्तर, पुस्तके तसेच इतर आवश्यक शालेय साहित्य देण्यात आले. शैक्षणिक साहित्य मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद या उपक्रमाचे विशेष आकर्षण ठरले. आर्थिकदृष्ट्या गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध व्हावे आणि त्यांना शैक्षणिक प्रगतीसाठी प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने ट्रस्टने हा उपक्रम राबविला.

# जात, हुंडा, कर्ज अन् दिखाऊपणाला लग्नातून हद्दपार करण्याचा निर्धार!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** जातव्यवस्था, हुंडापद्धती, अवाढव्य विवाहखर्च, विवाहासाठी घेतले जाणारे कर्ज, दिखाऊ प्रतिष्ठा आणि प्रदूषणकारी सोहळे विवाहसंस्थेतून हद्दपार करून समानता, विवेक, संविधानिक नैतिकता आणि उन्नत चेतनेवर आधारित 'तिरंगा धारणालय विवाह' व्यवस्था सुरू करण्याचा प्रस्ताव पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदेने जाहीर केला आहे.

या नव्या संविधानाधिष्ठित विवाहसंकल्पनेची सार्वजनिक घोषणा शुक्रवार, दि. २८ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ वाजता अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर करण्यात येणार असल्याची माहिती पीपल्स हेल्पलाईनचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ विधिज्ञ ड. कारभारी गवळी यांनी दिली.

'तिरंगा धारणालय विवाह' हा स्वतंत्र विवाहकायदा किंवा कोणताही धार्मिक पंथ नसून, कायदेशीरदृष्ट्या पात्र असलेल्या दोन प्रौढ व्यक्तींनी स्वेच्छेने स्वीकारावयाची ऐच्छिक संविधानाधिष्ठित विवाह-सनद असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले आहे. विवाहाची कायदेशीर नोंदणी लागू कायद्यांनुसारच केली जाईल. मात्र, जीवनसाथीची निवड जन्माची जात, उपजात, हुंडा, संपत्ती किंवा सामाजिक प्रतिष्ठेच्या निकषांवर न करता व्यक्तीची वैचारिक पात्रता, परस्पर सन्मान, लोकभक्ती, ज्ञानभक्ती, कर्मभक्ती, संविधानिक नैतिकता आणि कायद्याच्या राज्यावरील विश्वास या मूल्यांच्या आधारे व्हावी, हा या संकल्पनेचा मुख्य उद्देश आहे.

या विवाहव्यवस्थेत तिरंग्याच्या तीन रंगांना मूल्यात्मक अर्थ देण्यात आला आहे. भगवा रंग लोकभक्तीचा, पांढरा रंग ज्ञानभक्तीचा आणि हिरवा रंग कर्मभक्तीचा, तर अशोकचक्र संविधानिक नैतिकता आणि कायद्याच्या राज्याचे प्रतीक मानण्यात आले आहे. या मूल्यांवर आधारित सहजीवनातून पती-पत्नीमध्ये परस्पर विश्वास, समानता, सुरक्षितता आणि उन्नत आनंद निर्माण व्हावा, अशी संकल्पना मांडण्यात आली आहे.

# ऑटो एलपीजीच्या दरातील तफावत तपासा; रिक्षाचालकांना न्याय द्या

## नाशिकमध्ये ५९.९४ रुपये, तर अहिल्यानगरमध्ये ८४.४४ रुपये दर

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** नाशिक जिल्हा आणि अहिल्यानगर शहरातील ऑटो एलपीजी गॅसच्या दरामध्ये मोठी तफावत असल्याचा आरोप करत, या दराची तातडीने चौकशी करून गोरगरीब रिक्षा चालकांना न्याय व दिलासा द्यावा, अशी मागणी अहिल्यानगर जिल्हा ऑटो रिक्षा व टॅक्सी चालक-मालक संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबत संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी पुरवठा अधिकारी हेमलता बडे यांना निवेदन दिले.

संघटनेचे अध्यक्ष अविनाश घुले यांच्या मार्गदर्शनाखाली हे निवेदन देण्यात आले. यावेळी उपाध्यक्ष दत्ताभाऊ वामन, नासिर खान, सचिव अशोक औशीकर, असलम



शेख, शब्बीर शेख, संजय सहाने, राजीव काळे, सुनील ठाकरे, राजेश विधाते, ज्ञानेश्वर पाताळे, सागर लांडे, एकनाथ शिंदे, इलियास बेग, नितीन मांजरे, नितीन पुंड, राकेश साळवे, आयुब सय्यद, गणेश बागल, राजू शेख, राहुल अनुभवले, आशिष ताडला, वैष्णव हरवा, किरण ठोंबे यांच्यासह मोठ्या संख्येने रिक्षाचालक उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, अहिल्यानगर शहरातील रिक्षाचालक रिक्षा चालवून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. दिवस-रात्र मेहनत करून मिळणाऱ्या उत्पन्नातून घरखर्च, वाहनाचा देखभाल खर्च तसेच एलपीजी गॅसचा खर्च भागवावा लागतो. मात्र, सध्या नाशिक जिल्हा आणि अहिल्यानगर शहरातील ऑटो एलपीजीच्या दरामध्ये मोठी तफावत असल्याचे निदर्शनास आले आहे.

नाशिक जिल्ह्यात ऑटो एलपीजीचा दर ५९.९४ रुपये, तर अहिल्यानगर शहरात ८४.४४ रुपये असल्याचे संघटनेने निवेदनात नमूद केले आहे. दोन्ही जिल्ह्यांमध्ये एवढी मोठी दरतफावत का आहे? नाशिकमध्ये वेगळा आणि अहिल्यानगरमध्ये वेगळा दर का आकारला जातो? एलपीजी गॅसचा दर निश्चित करण्यामागील नेमके कारण काय आहे? याची सखोल चौकशी करण्याची मागणी संघटनेने केली आहे.


प्रो.फी. जमा.रु.
पान नं,

**सायटेशन नोटीस** दि.१०.०८.२०२६

**शेवगाव येथील तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी शेवगाव यांचे कोर्टात**

चौ.अ.नं. ४१८

अर्जदार

१. श्री किशोर पोपट आहेर रा. हिंगणगांव ने, ता. शेवगांव

सामनेवाला

सरकार

सदर अर्जदार हा मौजे हिंगणगांव ने येथील रहीवाशी आहे. सदर **अर्जदार श्री. किशोर पोपट आहेर यांच्या मुलीचा श्रावणी किशोर आहेर यांचा जन्म दि.१४.०७.२०२३ रोजी सिध्दीविनायक हॉस्पीटल शेवगांव ता. शेवगाव जि. अहिल्यानगर** असा तहसिल कार्यालय शेवगाव अभिलेखपाल येथे जन्माचा दाखला मिळणे बाबत अर्जदार यांनी अर्ज केला असता अर्जदार यांना नोंदी आढळ होत नसल्याचे कळविण्यात आले आहे. जन्म मृत्यु नोंदणी रजिस्टरला नोंद करण्याचे राहुन गेलेले आहे. त्यामुळे अर्जदार यांचे मुलीचा जन्म मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र (जन्म दिनांक नोंदणी दाखला) मिळु शकत नाही. त्यामुळे सदर अर्जदार यांचे शासकीय योजने कामी तसेच वेगवेगळ्या ठिकाणी अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अर्जदार यांचे मुलीचा जन्म नोंद पंचायत समिती कार्यालय, शेवगाव यांच्या जन्म मृत्यु नोवणी रजिस्टरला नोंद घेवुन तसा दाखला मिळणे न्यायाचे व गरजेचे आहे. सदरचा दाखला हा शासकीय कामासाठी आवश्यक आहे. सदर अर्जदार याने पंचायत समिती कार्यालय शेवगाव येथे जावुन जन्म मृत्यु प्रमाणपत्राबाबत मागणी केली असता नोंद नसल्याने त्या कार्यालयात जन्म मृत्युची नोंद नसलेबाबत दि.०७.०७.२०२६ रोजीचा दाखला सदर अर्जदारास देण्यात आलेला आहे. जन्म/मृत्युच्या च्या, १ वर्षाच्या आत मध्ये जन्म-मृत्यु नोंदणी न झाल्यास केवळ तालुका दंडाधिकारी यांच्या आदेशानेच नोंद घेता येवु शकते. अशी माहिती अर्जदारास ग्रामपंचायत येथे देण्यात आली. अशा परिस्थीती मध्ये सदर अर्जदार यांचा मुलीचा जन्म/मृत्यु नोंदणी जन्म-मृत्यु नोंदणी रजिस्टरला होणे न्यायाच्या व जरुरीचे आहे त्याकरीता योग्य तो आदेश मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने मे. कोर्टात दाखल केलेला आहे. त्यापेक्षा सदरहुन अर्जदाराचे सदरहु जन्म-मृत्यु नोंदीबाबत कोणास काही एक म्हणावयाचे असेल तर हया जाहीर नोटीसीच्या तारखेपासुन एक महिन्याचे आत दि. /०८/२०२६ पुर्वी त्याने हया कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात. आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्या तर सदरहुन कोर्ट अर्जदार यांचे हक्काबदल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास जन्म-मृत्यु नोंद घेणेबाबत आदेश करतील. आज दि. /०८/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी नोटीस दिले असे.

शिक्का सही/- हुकमावरुन

**तहसिलदार शेवगाव तथा तालुका दंडाधिकारी शेवगाव**

प्रो.फी. जमा.रु.
पान नं,

**सायटेशन नोटीस** दि.१०.०८.२०२६

**शेवगाव येथील तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी शेवगाव यांचे कोर्टात**

चौ.अ.नं. ५१७

अर्जदार

१. श्री शेख असीफ मंहमद, रा, दहीफळ, ता. शेवगांव

सामनेवाला

सरकार

सदर अर्जदार हा भौजे दहीफळ येथील रहीवाशी आहे. सदर **अर्जदार श्री. आरमान अनिस शेख यांच्या नातुचा आरमान अनिस शेख यांचा जन्म दि.१२.०८.२०१८ रोजी नित्यसेवा हॉस्पीटल शेवगांव ता. शेवगाव जि. अहिल्यानगर** असा तहसिल कार्यालय शेवगाव अभिलेखपाल येथे जन्माचा दाखला मिळणे बाबत अर्जदार यांनी अर्ज केला असता अर्जदार यांना नोंदी आढळ होत नसल्याचे कळविण्यात आले आहे. जन्म मृत्यु नोंदणी रजिस्टरला नोंद करण्याचे राहुन गेलेले आहे. त्यामुळे अर्जदार यांचे नातुचा जन्म मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र (जन्म दिनांक नोंदणी दाखला) मिळु शकत नाही. त्यामुळे सदर अर्जदार यांचे शासकीय योजने कामी तसेच वेगवेगळ्या ठिकाणी अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अर्जदार यांचे नातुचा जन्म नोंद पंचायत समिती कार्यालय, शेवगाव यांच्या जन्म मृत्यु नोंदणी रजिस्टरला नोंद घेवुन तसा दाखला मिळणे न्यायाचे व गरजेचे आहे. सदरचा दाखला हा शासकीय कामासाठी आवश्यक आहे. सदर अर्जदार याने पंचायत समिती कार्यालय शेवगाव येथे जावुन जन्म मृत्यु प्रमाणपत्राबाबत मागणी केली असता नोंद नसल्याने त्या कार्यालयात जन्म मृत्युची नोंद नसलेबाबत दि.०७.०७.२०२६ रोजीचा दाखला सदर अर्जदारास देण्यात आलेला आहे. जन्म/मृत्युच्या च्या १ वर्षाच्या आत मध्ये जन्म-मृत्यु नोंदणी न झाल्यास केवळ तालुका दंडाधिकारी यांच्या आदेशानेच नोंद घेता येवु शकते. अशी माहिती अर्जदारास ग्रामपंचायत येथे देण्यात आली. अशा परिस्थीती मध्ये सदर अर्जदार यांचा नातुचा जन्म/मृत्यु नोंद जन्म-मृत्यु नोंदणी रजिस्टरला होणे न्यायाच्या व जरुरीचे आहे त्याकरीता योग्य तो आदेश मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने मे. कोर्टात दाखल केलेला आहे. त्यापेक्षा सदरहुन अर्जदाराचे सदरहु जन्म-मृत्यु नोंदीबाबत कोणास काही एक म्हणावयाचे असेल तर हया जाहीर नोटीसीच्या तारखेपासुन एक महिन्याचे आत दि. /०८/२०२६ पुर्वी त्याने हया कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात. आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्या तर सदरहून कोर्ट अर्जदार यांचे हक्काबदल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास जन्म-मृत्यु नोंद घेणेबाबत आदेश करतील. आज दि. /०८/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी नोटीस दिले असे.

शिक्का सही/- हुकमावरुन

**तहसिलदार शेवगाव तथा तालुका दंडाधिकारी शेवगाव**

# दखल

## टपाल विभागाच्या निवृत्तीवेतन धारकांसाठी पेंशन अदालतीचे आयोजन

**पुणे :** टपाल विभागाच्या निवृत्तीवेतन धारक व कुटुंब निवृत्तीवेतन धारकांसाठी ८ सप्टेंबर २०२६ रोजी ११.३० वाजता मुख्य पोस्टमास्तर जनरल, महाराष्ट्र सर्कल, मुंबई ४०० ००१ येथे पेंशन अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

निवृत्तिवेतनधारकांच्या लाभाशी संबंधित तक्रारी, जे टपाल विभागातून निवृत्त झाले आहेत, ज्यांचा सेवेत असताना मृत्यू झाला आहे, अशा निवृत्तिवेतन संदर्भात ज्यांचे ३ महिन्यांच्या आत पूर्तता झालेली नाही अशा प्रकरणांचा डाक पेंशन अदालत मध्ये विचार केला जाईल. पेंशन अदालतीमध्ये वारसा प्रमाणपत्र, वेतनश्रेणी वाढविणे आणि धोरणात्मक बाबींसह शिस्तभंगाच्या आणि डी.पी.सी. च्या पुनरावलोकनासाठी प्रलंबित प्रकरणांचा विचार केला जाणार नाही. पेन्शनधारकांनी आपली तक्रार वैयक्तिकरित्या संलग्न नमुन्यात तीन प्रतीमध्ये वरिष्ठ लेखाधिकारी, सचिव, पेन्शन अदालत, मुख्य पोस्टमास्तर जनरल यांचे कार्यालय, महाराष्ट्र सर्कल, मुंबई जी.पी. ओ. इमारत, १ ला मजला, मुंबई ४०० ००१ येथे पाठवावी किंवा ई-मेलद्वारे रलल्ीं.ाहळपवळर्ीीं.सीं.ळप या पत्त्यावर २५ ऑगस्ट रोजी किंवा त्यापूर्वी सादर करावी. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा पेन्शन अदालतमध्ये विचार केला जाणार नाही, असे पुणे ग्रामीण मंडळाचे अधीक्षक दि. वि. सर्जेराव यांनी कळविले आहे.

## स्वातंत्र्यदिनी कुंभार बांधवांना हक्काची ओळख



**कवठे येमाई :** महाराष्ट्र शासनाच्या १० जून २०२६ रोजीच्या शासन निर्णयाची शिरूर तालुक्यात गतिमान अंमलबजावणी करण्यात आली. स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून तहसीलदार बाळासाहेब म्हस्के यांच्या पुढाकाराने कुंभार समाजातील पात्र लाभार्थ्यांना अधिकृत ओळखपत्रांचे वितरण करण्यात आले.

पारंपरिक व्यवसाय करणाऱ्या कुंभार समाजाला सामाजिक व आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी शासनाने हा निर्णय घेतला आहे. अधिकृत ओळखपत्रामुळे पात्र कारागिरांना शासकीय योजनांचा लाभ घेण्यासह प्रशासकीय कामकाजात सुलभता होणार आहे. तहसीलदार बाळासाहेब म्हस्के यांनी सांगितले की, शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ तळागाळातील प्रत्येक पात्र कारागिरापर्यंत पारदर्शकपणे पोहोचविणे हे प्रशासनाचे कर्तव्य आहे. त्यासाठी शासन निर्णयाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यात आली आहे.शिरूर तहसील कार्यालयातील लिपिक भानुदास येडे यांनी पात्र लाभार्थ्यांची माहिती संकलित करणे, यादी तयार करणे आणि ओळखपत्रांची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले.या उपक्रमासाठी राजर्षी शाहू प्रतिष्ठानचे अध्यक्ष भगवान अंजना रामचंद्र श्रीमंदीलकर यांनीही सातत्याने पाठपुरावा केला. त्यांनी तहसीलदार बाळासाहेब म्हस्के आणि लिपिक भानुदास येडे यांचे आभार मानले. स्वातंत्र्यदिनी मिळालेले ओळखपत्र हे कुंभार समाजासाठी हक्क, स्वाभिमान आणि सन्मानाचे प्रतीक असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.यावेळी भूमी अभिलेख विभागाचे उपअधीक्षक अमोल भोसले, नगरसेविका सविता राजापूरे, नगरसेविका स्वप्नाली जामदार, मच्छिंद्र जामदार, शिरूर ग्रामीणचे माजी सरपंच रामदास जामदार, शशिकांत शिर्के, विजय शिर्के, दत्तात्रय काळे यांच्यासह कुंभार समाजातील ज्येष्ठ नागरिक, कार्यकर्ते व समाजबांधव उपस्थित होते.शासन निर्णयाची तत्परतेने अंमलबजावणी झाल्याने शिरूर तालुक्यातील कुंभार समाजात समाधानाचे वातावरण असून, आगामी काळात अधिकाधिक पात्र लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

## 'ज्ञानेश्वर माऊली आणि स्वामी स्वरूपानंद यांचे विचार एकच' : उमेश महाराज बागडे



आळंदी : संत ज्ञानेश्वर महाराज आणि स्वामी स्वरूपानंद यांनी आपल्या जीवनातून प्रेम, भक्ती, समता, आत्मशुद्धी आणि मानवतेचा संदेश दिला. दोन्ही संतांच्या विचारांमध्ये विलक्षण एकरूपता असून, त्यांच्या शिकवणीतून आजच्या समाजाला योग्य दिशा मिळते, असे प्रतिपादन उमेश महाराज बागडे यांनी केले.

स्वामी स्वरूपानंद यांच्या पुण्यतिथीनिमित्त स्वामी कृपा हॉल येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दुपारी साडेतीन ते साडेचार या वेळेत स्वामींनी सिद्ध केलेल्या 'ॐ राम कृष्ण हरी' या मंत्राचा सामूहिक जप करण्यात आला. त्यानंतर ज्ञानेश्वरीतील १०८ ओव्यांचा संग्रह असलेल्या नित्यपाठाचे वाचन करण्यात आले.

यावेळी स्वामी स्वरूपानंद यांच्या अभंगांचा कार्यक्रम झाला. प्राजक्ता गोखले आणि मिताली यार्डे यांनी अभंग सादर करून उपस्थितांची दाद मिळविली.यानंतर उमेश महाराज बागडे यांचे प्रवचन झाले. 'श्री ज्ञानेश्वर माऊली आणि स्वामी स्वरूपानंद यांच्यातील एकरूपता' या विषयावर त्यांनी विविध दाखले देत अभ्यासपूर्ण विवेचन केले. संत ज्ञानेश्वर महाराजांनी 'हे विश्वचि माझे घर' या विचारातून विश्वबंधुत्वाचा संदेश दिला, तर स्वामी स्वरूपानंद यांनी नामस्मरण, साधना, आत्मचिंतन आणि सदाचारातून अंतःकरण शुद्धीचा मार्ग दाखविला, असे त्यांनी सांगितले. प्रवचनानंतर आरती करण्यात आली. त्यानंतर उपस्थित भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.

## धरणे भरली, तरी शेतीच्या पाण्याचा प्रश्न कायम

**सोमेश्वरनगर :** बारामती तालुक्याच्या पश्चिम भागात यंदा धरणे पूर्ण क्षमतेने भरली असून नीरा नदीपात्रातून पाणी वाहत आहे. मात्र, शेतीसाठी आवश्यक पाण्याचा प्रश्न अद्याप कायम आहे. या भागात मुसळधार पाऊस न झाल्याने ओढे-नाले अद्याप पूर्ण क्षमतेने वाहिलेले नाहीत.

सध्या श्रावण महिना सुरू असून दिवसभर गार वारा आणि थंड वातावरण जाणवत आहे. पावसाचे वातावरण असले तरी शेतकरी पिकांसाठी दमदार पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. मुसळधार पाऊस झाल्यास ओढे-नाले प्रवाहित होऊन शेतीला पाणी उपलब्ध होण्यास मदत होते.

दरम्यान, गावोगावी असलेल्या तलावांचे खोलीकरण करण्यात आल्याने त्यामध्ये मोठ्या प्रमाणात पाणीसाठा होण्यास मदत झाली आहे. त्यामुळे भविष्यात शेतीच्या पाण्याचा प्रश्न काही प्रमाणात कमी होण्याची शक्यता आहे. मात्र, पिकांची सध्याची गरज लक्षात घेता शेतकऱ्यांचे लक्ष अजूनही समाधानकारक पावसाकडे लागले आहे.

# चाकणच्या वाहतूक कोंडीवर 'ॲक्शन प्लॅन'

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** चाकण औद्योगिक परिसरातील वाहतूक कोंडी, रस्त्यांची दुरवस्था, पार्किंग, अतिक्रमणे व वीजपुरवठ्याच्या प्रश्नांवर कालबद्ध उपाययोजना करण्याचा निर्णय घेण्यात आला. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्त कार्यालयात झालेल्या बैठकीत विविध विभागांना कामांची जबाबदारी व कालमर्यादा निश्चित करण्यात आली.



बैठकीस पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, आमदार बाबाजी काळे तसेच पीएमआरडीए, एमआयडीसी, सार्वजनिक बांधकाम विभाग, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, नगर परिषद, जिल्हा परिषद व पोलीस विभागाचे अधिकारी उपस्थित होते.चाकणमधील प्रमुख रस्त्यांवरील खड्डे व साइडपट्ट्यांची दुरुस्ती ३१ ऑगस्टपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. रस्त्यावरील अवजड वाहनांच्या पार्किंगला शुक्रवारपासून प्रतिबंध करण्यात येणार असून, उपलब्ध मोकळ्या जागांचा पार्किंगसाठी वापर केला जाणार आहे.वाहतूक व्यवस्थेसाठी १०० महाराष्ट्र सुरक्षा दलाचे (चडऋ) जवान दोन पाळ्यांमध्ये नियुक्त करण्यात येणार आहेत. बंद पडलेली वाहने तातडीने हटविण्यासाठी मोठ्या क्षमतेच्या क्रेनची व्यवस्था केली जाणार आहे.अनधिकृत टपऱ्या, स्टॉल, गोदामे व अन्य अतिक्रमणांवर २५ ऑगस्टपासून महिनाभरात कारवाई केली जाणार आहे. तसेच राष्ट्रीय महामार्गावरील अनधिकृत डिव्हायडर कट बंद करण्याचे निर्देश देण्यात आले. चाकण परिसरातील सुमारे ५०० किलोमीटर रस्त्यांसाठी भविष्यात सीसीटीव्ही, कृत्रिम बुद्धिमत्ता व वाहतूक सिम्युलेशनचा वापर करण्याचे नियोजन आहे. वीज ट्रिपिंग व लोडशेडिंगचा प्रश्न सोडविण्यासाठीही ३१ ऑगस्टपर्यंत आवश्यक कामे करण्याचे नियोजन करण्यात आले.

## शिरूरमध्ये ५,४८५ शिधापत्रिका एपीएल व्हाईट

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कवठे येमाई :** शिरूर तालुक्यातील ५,४८५ शिधापत्रिकांवरील स्वस्त धान्याचा लाभ बंद करण्यात आला असून, या शिधापत्रिका 'एपीएल व्हाईट' प्रवर्गात वर्गीकृत करण्यात आल्या आहेत. केंद्र शासनाच्या 'मिशन सुधार' अर्थात 'राईटफुल टार्गेटिंग ऑफ बेनिफिशरीज' अंतर्गत राज्यभर शिधापत्रिकांची तपासणी सुरू असून, त्याचाच भाग म्हणून ही कारवाई करण्यात आली आहे.




याबाबत शिरूर तालुका पुरवठा विभागाचे सहायक पुरवठा निरीक्षण अधिकारी दीपक केदार यांनी माहिती दिली. शासनाच्या तपासणीमध्ये अपात्र, दुबार, मृत तसेच स्थलांतरित लाभार्थ्यांच्या नावे असलेल्या शिधापत्रिकांची पडताळणी करण्यात येत आहे. पात्र लाभार्थ्यांनाच स्वस्त धान्याचा लाभ मिळावा आणि धान्य वितरणातील गैरप्रकारांना आळा बसावा, हा या मोहिमेचा उद्देश आहे.

शिरूर तालुक्यातील ५,४८५ शिधापत्रिकांमध्ये उच्च उत्पन्न गटातील नागरिकांचा समावेश असल्याचे तपासणीत आढळून आले आहे. यामध्ये नियमित मासिक पगार घेणारे खासगी कर्मचारी, आयकर विवरणपत्र भरणारे नागरिक, उद्यम पोर्टलवर व्यावसायिक नोंदणी असलेल्या व्यक्ती तसेच सोसायटी किंवा कंपनीच्या संचालक मंडळावरील व्यक्तींचा समावेश आहे.

या कारवाईमुळे संबंधित शिधापत्रिकांवरील पीएचएच व अंत्योदय योजनेंतर्गत मिळणारा धान्याचा लाभ बंद करून शिधापत्रिका एपीएल व्हाईट प्रवर्गात वर्गीकृत करण्यात आल्या आहेत. दरम्यान, वगळण्यात आलेल्या शिधापत्रिकांबाबत पुरवठा विभागाकडून आवश्यक कागदपत्रांची पडताळणी सुरू आहे. पात्रता सिद्ध करणाऱ्या लाभार्थ्यांवर नियमानुसार पुढील कार्यवाही केली जाणार आहे. त्यामुळे संबंधित नागरिकांनी आपल्या शिधापत्रिकेची स्थिती तपासून आवश्यक कागदपत्रांसह संबंधित पुरवठा कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.राज्यात या मोहिमेअंतर्गत सुमारे ६० हजार शिधापत्रिका वगळण्यात आल्या असून, पुणे जिल्ह्यातही मोठ्या प्रमाणावर शिधापत्रिकांवर कारवाई करण्यात आली आहे. शिधापत्रिका वगळण्यात पुणे जिल्हा राज्यात दुसऱ्या क्रमांकावर असल्याची माहिती देण्यात आली.

## श्रावण मासानिमित्त सासवड एस टी आगाराची विशेष प्रवासी योजना

**सासवड :** सध्या पवित्र श्रावण महिना सुरु असून भाविकांना महाराष्ट्र व बाहेरील अनेक धार्मिक स्थळांना देवदर्शनाला जाण्यासाठी सासवड एस टी आगाराने श्रावणमास विशेष प्रवासी आयोजन केले असुन भाविकांनी या सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन आगार प्रमुख वृषाली तांबे व स्थानक प्रमुख मोहिनी ढेरे यांनी केले आहे. या योजनेत किमान ४० प्रवाशी असणे गरजेचं असुन एस टी च्या तिकीटातील सध्याच्या सवलती याला लागू आहेत असे आगाराकडून सांगण्यात आले. सुरक्षित आरामदायी, स्वच्छ बस सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन तांबे व ढेरे यांनी केले आहे



आगारातून सासवड- सोलापूर -अक्कलकोट -गाणगापुर -तुळजापूर -पंढरपूर दोन दिवसीय टूर असुन तिकिट १८०० व सवलत धारकांना ९०० रुपये, सासवड -शनिशिंगणापूर शिर्डी -नाशिक -वणी -त्र्यंबकेश्वर दोन दिवसांची टूर तिकीट १८६० व सवलत ९३० राहणार आहे तर साडेतीन शक्तीपीठ अंतर्गत सासवड -कोल्हापूर -पंढरपूर -तुळजापूर माहूर -वणी ही तीन दिवसांची टूर असून त्याचे शुल्क ३८९० तर सवलत १९४५ राहणार आहे. याशिवाय उज्जैन महाकाल हे चार दिवसांचे पॅकेज ३७७५ व सवलत २२६५

रुपये असल्याची माहिती आगार व्यवस्थापणाकडून देण्यात आली आहे.सासवड शेगाव, अष्टविनायक, गणपती पुळे, कोल्हापूर ज्योतिबा अशा टूर सुद्धा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. प्रवाशांनी या सुविधेसाठी वृषाली तांबे मोबाईल नंबर ९८६०६३८४८७ मोहिनी ढेरे ८२३७७४६९५२ कैलास जगताप ९५५२२४२९९९ किंवा अमित वाल्मिकी यांच्या ९७६२४३५६७७ या नंबरवर संपर्क साधावा असे आवाहन वृषाली तांबे व मोहिनी ढेरे यांनी केले आहे.

## आळंदीत खुनाचा गुन्हा अवघ्या तासाभरात उघड; आरोपी अटक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळंदी :** झोपण्याच्या जागेवरून झालेल्या वादातून लोखंडी सळईने डोक्यात, तोंडावर व पायावर मारहाण करून एका व्यक्तीचा खून करण्यात आल्याची घटना आळंदीत घडली. आळंदी पोलिसांनी या प्रकरणाचा अवघ्या तासाभरात तपास लावत आरोपीला अटक केली.बाबासाहेब उर्फ राहुल साहेबराव कांबळे (रा. लिंबाची वाडी, जि. बीड) असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. याप्रकरणी अनंत दिगंबर तौर (रा. शेलगाव धडी, ता. माजलगाव, जि. बीड) याला पोलिसांनी अटक केली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवारी (दि. १७) रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास आळंदीतील प्रदक्षिणा रोडवरील भाई मनोहर कोतवाल गोडी कामगार धर्मशाळा ट्रस्टच्या शेडमधील मोकळ्या जागेत ही घटना घडली. झोपण्याच्या जागेच्या कारणावरून आरोपी तौर आणि राहुल कांबळे यांच्यात वाद झाला. या वादातून तौर याने लोखंडी सळईने कांबळे यांच्या डोक्यावर, तोंडावर तसेच पायावर मारहाण केली. गंभीर मारहाणीत ते जखमी झाले.घटनेची माहिती मिळताच आळंदी पोलिसांनी तत्काळ तपासाची चक्रे फिरवून आरोपीचा शोध घेतला. अवघ्या तासाभरात आरोपीला ताब्यात घेण्यात आले. याप्रकरणी दत्तात्रय शेषेराव कांदे (वय ३७, व्यवसाय मजुरी/कॅटरिंग, मूळ रा. संगम, जि. बीड; सध्या रा. आळंदी) यांनी पोलिसांत तक्रार दिली आहे.या घटनेमुळे आळंदी परिसरात खळबळ उडाली असून, पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

## संविधानाचा अवमान करणाऱ्यांच्या निषेधार्थ २० ऑगस्ट रोजी धरणे आंदोलन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** भारतीय संविधान आणि मल्लिकार्जुन खर्गे यांचा अवमान करणाऱ्या जातीयवादी प्रवृत्तींच्या विरोधात पुणे शहर, जिल्ह्यातील सर्वपक्षीय संविधानवादी नागरिकांच्या वतीने २० ऑगस्ट रोजी धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. याबाबतची माहिती भारतीय संविधान संवर्धन समितीच्या वतीने आज पत्रकार परिषदेत देण्यात आली.यावेळी काँग्रेस पक्ष अनुसूचित जाती विभागाचे पुणे (पूर्व विभाग) शहराध्यक्ष कुणाल राजगुरू, विठ्ठल गायकवाड, माजी नगरसेविका लता राजगुरू, संग्राम रोहम आदि मान्यवर उपस्थित होते.

देशाच्या घटनात्मक सर्वोच्च पदावर असलेले वरिष्ठ संसदीय सभागृहाचे सदस्य व राज्यसभेतील विरोधी पक्षनेते तसेच काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे हे ८ ऑगस्ट २०२६ रोजी विजय शंखनाद रॅलीच्या कार्यक्रमासाठी उत्तराखंड मधील हलदानी येथील रामलीला मैदानावर उपस्थित होते. कार्यक्रम संपल्यानंतर जातीयवादी प्रवृत्तीच्या काही लोकांनी गोमूत्र शिंपडून मैदान पवित्र केल्याचा दावा केला आहे, ही कृती म्हणजे केवळ मल्लिकार्जुन खर्गे यांचाच नव्हे तर भारतीय संविधानाचा अवमान असल्याचे समितीने म्हटले आहे.या घटनेच्या निषेधार्थ गुरुवार, २० ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत डॉ. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, पुणे येथे धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.

## गंगाराम केदारी यांचे वृद्धापकाळाने निधन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**लोणी धामणी :** पहाडदरा ( ता . आंबेगाव ) येथील गंगाराम केदारी यांचे सोमवार, दि. १७ ऑगस्ट २०२६ रोजी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. मृत्यूसमयी ते ८६ वर्षांचे होते.त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. रयत शिक्षण संस्थेचे महात्मा गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, मंचर येथे कार्यरत असलेले शिक्षक गोरक्षनाथ केदारी यांचे ते आजोबा होत.

## पत्रकार संघ बारामती कार्यकारिणी जाहीर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** पत्रकार संघ बारामती या संघटनेची वार्षिक सर्वसाधारण बैठक शुक्रवार (दि.१४) ऑगस्ट रोजी ज्येष्ठ नागरिक संघ बारामती येथे संपन्न झाली. या बैठकीत नवीन कार्यकारणी सर्वानुमते घोषित करण्यात आली.

या बैठकीत २०२६ ते २०२८ या कार्यकालासाठी पुढील प्रमाणे कार्यकारणी घोषित करण्यात आली. अध्यक्ष नवनाथ बोरकर, उपाध्यक्ष सागर सस्ते, शिवाजी ताटे, सचिव निलेश जाधव, सहसचिव सुरज देवकाते, कार्याध्यक्ष शुभांगी महाडिक,खजिनदारस्वप्निलशिंदे,सहखजिनदारप्रशांतकुचेकरयांचीएकमताने बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी सुधीर जन्नू डॉ. विजयकुमार भिसे सोमनाथ कवडे, तैनूर शेख,दीपक पडकर, दत्तात्रेय महाडिक, राजेश वाघ,मन्सूर शेख,संजय भिसे, संतराम घुमटकर, मल्लिकार्जुन हिरेमठ, श्याम शिंदे, कृष्णमूर्ती जगताप हे कार्यकारणी सदस्य सदस्य उपस्थित होते.

पत्रकार संघ बारामती हा नावाजलेला आणि पत्रकारांच्या समस्या अडचणी सोडवणारा पत्रकारांचा संघ म्हणून परिचित आहे. या पत्रकार संघाची वाटचाल यशस्वीरित्या पुढे अविरतपणे चालवण्यासाठी आणि संघ महाराष्ट्रत नावारूपाला आणण्यासाठी मी प्रामाणिकपणे काम करून पत्रकारांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी सोडवण्यासाठी सदैव प्रयत्नशील राहील असे आश्वासन नवनिर्वाचित अध्यक्ष नवनाथ बोरकर यांनी यावेळी दिले.



## अलंकापुरीत नागदेवतेची सनई-चौघड्यांच्या गजरात मिरवणूक

**प्रतिनिधी, राष्ट्र सह्याद्री**

**आळंदी :** गावण महिन्यातील पहिला महत्त्वाचा सण असलेल्या नागपंचमीचा उत्सव तीर्थक्षेत्र आळंदीत भक्तिमय वातावरणात पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानच्या वतीने नागदेवतेची सनई-चौघड्यांच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीदरम्यान भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.

जुन्या नगरपरिषदेच्या जवळील जागेत नागदेवतेचे विधिवत पूजन करण्यात आले. संत ज्ञानेश्वर माऊलींच्या सेवेत असलेल्या स्थानिक आळंदीकर मानकरी कुटुंबातील कुऱ्हाडे



मंदिरातील पालखी मंडपात आगमन झाले. यावेळी नागदेवतेचे पूजन करून पुरणपोळीचा नैवेद्य दाखविण्यात आला. दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. नागपंचमीच्या माध्यमातून नाग या प्राण्याबद्दल समाजात आदर व पूज्य भावना रुजविण्याची परंपरा जपली जात आहे. वेदकालापासून चालत आलेल्या या परंपरेचे आळंदीतही श्रद्धेने पालन करण्यात आले. सनई-चौघड्यांचा निनाद, धार्मिक विधी आणि भाविकांची उपस्थिती यामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. मंदिर समितीच्या . ज्योती चिताळकर पाटील, अनिता चिताळकर पाटील, निर्मला चिताळकर पाटील, सृष्टी घुंडरे पाटील, सुवर्णा आरु तसेच माजी नगराध्यक्ष राहुल चिताळकर पाटील, योगीराज कुऱ्हाडे पाटील, विठ्ठल घुंडरे पाटील, भीमाशंकर वाघमारे, बारकू वाघमारे, पुरुषोत्तम वाघमारे उपस्थित होते.

# पुणे जिल्ह्यात एसआयआरची प्रक्रिया अंतिम टप्प्यात

## सात लाख २५ हजार ४९ ॲनोमलीजची नोंद; ॲनोमली व 'नो लिंकज' मतदारांची सुनावणी होणार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** पुणे जिल्ह्यात विशेष पुनरिक्षण प्रक्रियेअंतर्गत मतदारांच्या एन्युमरेशन फॉर्मच्या वितरणापासून ते डिजिटलायझेशनपर्यंतची प्रक्रिया आता अंतिम टप्प्यात पोहोचली आहे.

जिल्ह्यातील तब्बल ९० लाख ८० हजार १७३ मतदारांना एन्युमरेशन फॉर्मचे वाटप करण्याचे काम ९९.९९ टक्के पूर्ण झाले असून, ९९.९४ टक्के फॉर्मचे डिजिटलायझेशनही पूर्ण झाले आहे. या प्रक्रियेदरम्यान मतदारांच्या जुन्या व सध्याच्या नोंदींमध्ये आढळलेल्या तफावतींच्या ७ लाख २५ हजार ४९ ॲनोमलीज समोर आल्या असून, संबंधित मतदारांना सुनावणीची संधी देण्यात येणार आहे.पुणे जिल्ह्यातील एस आय आय आर अंतर्गत एन्युमरेशन फॉर्म वितरणाची मोहीम आता पूर्ण झाली आहे. जिल्ह्यात एकूण ९० लाख ८० हजार १७३ मतदार असून, त्यांना फॉर्म वाटपाची प्रक्रिया जवळपास शंभर टक्के पूर्ण झाली आहे. फॉर्मचे डिजिटलायझेशनही अंतिम टप्प्यात असून, आतापर्यंत ९९.९४ टक्के फॉर्म डिजिटल करण्यात आले आहेत.

वय, नाव अथवा मॅपिंगमधील तफावतींमुळे ॲनोमली डिजिटलायझेशनच्या प्रक्रियेत ७ लाख २५ हजार ४९ ॲनोमलीज आढळून आल्या आहेत. २००२ मधील मतदाराच्या नोंदीतील वय आणि सध्याच्या नोंदीतील वय यामध्ये अपेक्षित ताळमेळ नसणे, नावामध्ये काही चूक असणे किंवा मॅपिंगच्या प्रक्रियेत त्रुटी राहणे, अशा विविध कारणांमुळे ॲनोमली निर्माण होऊ शकते.

विशेषतः मॅपिंग करताना दोन भावंडांमधील वयाचा फरक नऊ महिन्यांपेक्षा कमी दाखविला गेल्यासही सॉफ्टवेअरमध्ये ॲनोमली निर्माण होऊ शकते. त्यामुळे ॲनोमली आढळली म्हणजे संबंधित मतदाराची नोंद चुकीचीच आहे, असे गृहीत धरले जाणार नाही. अशा सर्व प्रकरणांची सुनावणी घेऊन आवश्यक ती पडताळणी केली जाणार आहे.

**ॲनोमली मतदारांना सुनावणीची संधी :**

ॲनोमलीमध्ये आलेल्या सर्व मतदारांसाठी सुनावणीच्या कालावधीत सॉफ्टवेअरच्या माध्यमातून नोटिसा जनरेट करण्यात येणार आहेत. त्यानंतर संबंधित मतदारांची सुनावणी घेऊन त्यांच्या नोंदींबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येणार आहे.

**'नो लिंकज' प्रकरणांचीही सुनावणी :**

ॲनोमलीप्रमाणेच 'नो लिंकज' असलेल्या मतदारांचीही सुनावणी घेण्यात येणार आहे. २००२ च्या मतदार यादीमध्ये ज्यांचे नाव नव्हते आणि त्यांच्याशी संबंधित आई, वडील, आजी, आजोबा किंवा अन्य नातेवाईकांची नोंद २००२ च्या यादीशी जोडता आली नाही, अशा मतदारांचा समावेश 'नो लिंकज'मध्ये करण्यात आला आहे.

या मतदारांनाही त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात येणार असून, सुनावणीनंतर नियमानुसार पुढील प्रक्रिया करण्यात येईल.

ए एस डी यादी संकेतस्थळावर उपलब्ध :

दरम्यान, ए एस डी (Absent, Shifted, dead Duplicate) मतदारांच्या सर्व विधानसभा मतदारसंघनिहाय याद्या जिल्हाधिकारी, पुणे यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. नागरिकांनी या याद्यांमध्ये आपले नाव आहे किंवा नाही, याची तपासणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले आहे.ए एस डी यादीमध्ये एखाद्या मतदाराचे नाव आढळल्यास संबंधित मतदाराने फॉर्म क्रमांक ६ भरून नव्याने मतदार नोंदणीसाठी अर्ज करणे आवश्यक आहे.

**राज्य बदलल्यास फॉर्म ६ आणि ७ :**

एखादा मतदार पूर्वी गोवा, बिहार किंवा अन्य राज्यात मॅप झालेला असेल आणि त्याची नोंद महाराष्ट्रात करावयाची असेल, तर संबंधित जुन्या ठिकाणी फॉर्म क्रमांक ७ भरावा लागेल. त्यानंतर महाराष्ट्रात फॉर्म क्रमांक ६ भरून मतदार नोंदणी करावी लागेल.

# गड-किल्ल्यांच्या धर्तीवर साकारतेय मच्छिंद्रनाथाचे संजीवन समाधी मंदिर

## ७३ कोटींचा आराखडा; काळ्या पाषाणावर होणार आकर्षक कोरीव काम

**शिवदास मरकड / राष्ट्र सह्याद्री**



**तिसगाव :** अहिल्यानगर व बीड जिल्ह्याच्या सीमेवरील गर्भगिरी पर्वत रांगांमध्ये मायंबा-सावरगाव येथे नाथ संप्रदायाचे आद्य मच्छिंद्रनाथांचे संजीवन समाधी मंदिर गड-किल्ल्यांच्या धर्तीवर साकारले जात आहे. पौराणिक वास्तुशैलीला धक्का न लावता काळ्या पाषाणावर आकर्षक कोरीव काम करून भव्य मंदिर उभारण्यात येत असून, या प्रकल्पासाठी सुमारे ७३ कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला आहे.

मंदिराच्या मुख्य समाधीस्थळासाठी ११ फूट खोलीचे बांधकाम पूर्ण झाले असून, दीपमुहूर्तावर विश्वस्तांच्या हस्ते जोत्याच्या बांधकामासाठी काळ्या पाषाणाची कोरीव शिळा बसविण्यात आली. सुमारे १०० फूट रुंदी, १५० फूट लांबी आणि १०९ फूट शिखर उंची असलेल्या या मंदिराचे बांधकाम आगामी साडेतीन वर्षांत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. मंदिरासाठी नांदेड जिल्ह्यातून कोरीव कामासाठी योग्य काळा पाषाण आणण्यात आला आहे. पुण्यातील कुशल कारागिरांकडून दगडावर कलाकुसरीचे काम सुरू आहे. गड-किल्ल्यांची वास्तुशैली आणि पौराणिक परंपरा यांचा संगम साधत मंदिराची रचना करण्यात येत आहे. देवस्थान परिसरात जलसंवर्धनाची विविध कामे करण्यात आली असून, पाच हजार वृक्षांची लागवड व संवर्धन करण्यात आले आहे. त्यामुळे धार्मिक पर्यटन यासोबतच निसर्ग पर्यटनालाही चालना मिळत आहे.

काळा पाषाणात साकारला जाणारे हे देशातील एकमेव मंदिर ठरणार असल्याचा दावा देवस्थान समितीचे अध्यक्ष दादासाहेब चितळे व सचिव बाबासाहेब यांनी केला. दोन मजली प्रशस्त दर्शनबारी, अद्ययावत भक्तनिवास, अन्नछत्रालय आणि स्वच्छतागृहांची कामे अंतिम टप्प्यात आहेत. दर महिन्याच्या अमावास्येला लाखो भाविक मच्छिंद्रनाथांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी गडावर येतात. मंदिराच्या विकासासाठी भाविकांकडून देणगीचा मोठा ओघ सुरू आहे.मच्छिंद्रनाथ देवस्थान समितीतर्फे दर्शनाला येणाऱ्या भाविकांसाठी निवास व्यवस्था, पार्कींग ,आरोग्य सुविधा पिण्याचे पाणी अन्नदान या सर्वसुविधा भाविकांना देण्यात येत आहेत. मंदिराकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्याच्या दोन्ही बाजूने घनदाट झाडी, व्यावसायिकांसाठी दुकाने थाटली आहेत. व्यावसायिक दुकानाचे व येणाऱ्या भाविकांचे दर्शनाचे योग्य नियोजनामुळे भाविकांनी देवस्थानसमितीचे कौतुक करतात.

**आ. सुरेश धस यांच्या पाठपुराव्याला यश**

या देवस्थानच्या विकासासाठी आमदार सुरेश धस यांनी शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सहकार्याने विविध विकासकामांसाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यात आला. त्यामुळे मच्छिंद्रनाथ गडाचा धार्मिक पर्यटन केंद्र म्हणून कायापालट होण्यास वेग आला आहे.

मच्छिंद्रनाथांचे हे स्थान केवळ धार्मिक श्रद्धेचे केंद्र न राहता मराठवाड्यातील प्रमुख पर्यटनस्थळ म्हणून विकसित व्हावे, यासाठी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला. मुख्यमंत्री यांच्या सहकार्याने विकासकामांसाठी आवश्यक निधी मिळवून देण्याचा प्रयत्न केला असून, दर्जेदार सुविधा मिळाव्यात आणि सर्वांगीण विकास व्हावा, हा या पाठपुराव्यामागचा उद्देश आहे.

# न्यायालयाच्या आदेशाला केराची टोपली!

## विसापूर धरणालगत अतिक्रमणे आजही कायम

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** विसापूर धरणालगतच्या शासकीय जमिनीवरील अतिक्रमण हटवून संबंधित जमीन कुकडी सिंचन विभागाच्या ताब्यात देण्याचे स्पष्ट आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिले असतानाही, आजही अतिक्रमणे कायम असल्याची स्थिती समोर येत आहे. त्यामुळे न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी नेमकी कुठे अडकली, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

पिंपळगाव पिसा येथील जलिंदर विनायक पांडरकर यांनी विसापूर धरणाच्या काठावरील शासकीय जमिनीवरील अतिक्रमण व बेकायदा बांधकाम हटविण्यासाठी जनहित याचिका दाखल केली होती. या प्रकरणात न्यायमूर्ती विभा कंकणवाडी व न्यायमूर्ती हितेन एस. वेणगावकर यांच्या खंडपीठाने ७ एप्रिल २०२६ रोजी महत्त्वपूर्ण आदेश दिला. न्यायालयासमोर सादर केलेल्या शासकीय अहवालात विसापूर धरणालगत पश्चिम व नैऋत्य बाजूस ६ हेक्टर ३२ आर क्षेत्रावर अतिक्रमण झाल्याचे नमूद करण्यात आले होते. यापूर्वी प्रशासनाने सुमारे सात एकर अतिक्रमित जमीन हटवून तिचा ताबा कुकडी सिंचन विभागाकडे दिल्याचेही न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले होते.विशेष म्हणजे, संबंधितांना जमिनीच्या वापरासाठी दिलेली परवानगी ३१ ऑक्टोबर २००८ पर्यंतच होती. त्यानंतर कोणतीही परवानगी वाढविण्यात आलेली नसल्याचे शासकीय नोंदीत स्पष्ट झाले.

तरीही या जमिनीचा वापर सुरू राहिल्याचे प्रकरण न्यायालयापर्यंत पोहोचले.यानंतर न्यायालयाने जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक असल्यास वादग्रस्त जमिनीची पुन्हा मोजणी करण्याचे, संबंधितांनी मोजणीस सहकार्य करण्याचे आणि अतिक्रमित जमीन संबंधितांकडून घेऊन कुकडी सिंचन विभागाकडे देण्याचे आदेश दिले. ही संपूर्ण प्रक्रिया तीन महिन्यांत पूर्ण करण्याचे निर्देशही न्यायालयाने दिले.

## द•ख•ल

### तुकाराम मुंडे यांच्या मोहिमेला शासनाने पूर्ण पाठबळ द्यावे : ॲड. डॉ. अशोक येंडे

**अहिल्यानगर :** महाराष्ट्रात अन्नभेसळ, अस्वच्छ अन्ननिर्मिती, निकृष्ट साठवणूक आणि विनापरवाना खाद्य व्यवसायांविरुद्ध कठोर कारवाई करणारे अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त. तुकाराम मुंडे यांच्या



मोहिमेला शासनाने पूर्ण पाठबळ व संस्थात्मक संरक्षण द्यावे.अशी मागणी न्यू लॉ कॉलेजचे माजी प्राचार्य, सर्वोच्च न्यायालयाचे विधिज्ञ आणि शिक्षणतज्ज्ञ ॲड. डॉ.अशोक येंडे यांनी मुख्यमंत्री. देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली होती. मुख्यमंत्री कार्यालयाने या निवेदनाची तात्काळ गांभीर्याने दखल घेत, पुढील योग्य कारवाईसाठी ते महाराष्ट्राच्या मुख्य सचिवांकडे पाठवले असल्याचे डॉ. येडे यांना कळवले आहे. मुख्यमंत्री कार्यालयाचा हा त्वरित प्रतिसाद सार्वजनिक आरोग्य व प्रशासकीय उत्तरदायित्वाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. डॉ. अशोक येडे यांच्या निवेदनात अन्नभेसळ ही केवळ ग्राहकांची फसवणूक नसून नागरिकांच्या आरोग्याला आणि जीवाला थेट धोका निर्माण करणारी बाब आहे.प्रशासकीय स्वायत्तता व कार्यकाळ मुंडे यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेली कारवाई कायदेशीर प्रक्रिया, पारदर्शकता आणि समानतेच्या तत्त्वांचे पालन करून अधिक प्रभावीपणे राबवण्यात यावी. प्रभावशाली हितसंबंधांच्या दबावापासून अधिकाऱ्यांचे संरक्षण करून त्यांना पुरेसा कार्यकाळ व प्रशासकीय स्वायत्तता मिळायला हवी. नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करणाऱ्या प्रामाणिक व कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांना आवश्यक असलेल्या संस्थात्मक पाठबळाचा प्रश्न उपस्थित केला.

### कोनोशी आश्रमशाळेत स्वातंत्र्यदिन साजरा



**कोरडगाव :** आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाच्या प्राथमिक आश्रमशाळा, कोनोशी, येथे भारताचा ८० वा स्वातंत्र्यदिन विविध देशभक्तीपर उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी सादर केलेली स्वागतगीते, कवायत, देशभक्तीपर गीते आणि मनोगतांनी उपस्थित ग्रामस्थ, पालक व मान्यवर भारावून गेले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सैनिक श्री. दिलीपराव पालवे मेजर होते. त्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहणानंतर विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत सादर करून तिरंग्याला मानवंदना दिली. कार्यक्रमास संतोष दौंड, शिक्षण विस्तार अधिकारी, पालघर, एल. डी. खेडकर, बद्रीनाथ बडे, सुभाष खेडकर, तुकाराम खेडकर, संभाजी खेडकर, श्रावण कसबे, संजय शिंदे, मोहन चव्हाण, प्रवीण तुळशीराम चव्हाण, लहू राठोड, राजेंद्र चव्हाण यांच्यासह पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आश्रमशाळेचे कर्मचारी ए. बी. नरोडे यांनी केले, तर गोरडे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या सांगतेनंतर विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले तसेच वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

### श्रीगोंद्यात धोक्याची घंटा सायबर गुन्हेगारी वाढतेय?

**श्रीगोंदा :** श्रीगोंद्यात सायबर गुन्हेगारी वाढत चालल्याने बदलत्या गुन्हेगारीचे धक्कादायक चित्र समोर आणले आहे. पारंपरिक गुन्ह्यांमध्ये सुमारे ६ टक्क्यांची घट झाली असली, तरी सायबर गुन्हे, ऑनलाइन आर्थिक फसवणूक, महिलांवरील अत्याचार आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून होणारे गुन्हे झपाट्याने वाढत असल्याचे स्पष्ट झाले आहे. वाढती लोकसंख्या, नागरीकरण आणि औद्योगिकीकरणामुळे सर्वाधिक गुन्हे नोंदविण्यात येत आहेत. महिलांविरोधातील गुन्ह्यांमध्ये उत्तर प्रदेशनंतर महाराष्ट्राचा क्रमांक लागतो. विविध योजना राबवूनही महिलांच्या सुरक्षेबाबत अपेक्षित सुधारणा झालेली नसल्याचे आकडेवारीतून दिसून येते.देशभरात सायबर गुन्ह्यांमध्ये तब्बल १८ टक्क्यांची वाढ झाली असून, त्यातील दोनतृतीयांश प्रकरणे ऑनलाइन आर्थिक फसवणुकीशी संबंधित आहेत. फिशिंग, बनावट गुंतवणूक योजना, डिजिटल पेमेंट फसवणूक, ओळख चोरी, क्रिप्टोकरन्सी घोटाळे आणि एआयच्या साहाय्याने होणाऱ्या फसवणुकीमुळे नागरिकांची चिंता वाढली आहे. अनेक शहरेग्रामीण भाग सायबर गुन्हेगारांच्या रडारवर असल्याचेही अहवालात नमूद करण्यात आले आहे.राज्यांच्या सीमांपलीकडे आणि परदेशातून कार्यरत असलेल्या सायबर टोळ्यांमुळे तपास यंत्रणांसमोर नवे आव्हान उभे राहिले आहे. त्यामुळे प्रत्येक जिल्ह्यात अत्याधुनिक सायबर पोलीस ठाणे, डिजिटल फॉरेन्सिक प्रयोगशाळा, -ख आधारित तपास यंत्रणा आणि प्रशिक्षित सायबर तज्ज्ञांची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली आहे.अहवालात आणखी एक चिंताजनक बाब म्हणजे, महिलांवरील गुन्ह्यांमध्ये काही प्रमाणात घट दिसत असली तरी घरगुती हिंसाचार अजूनही सर्वाधिक नोंदवला जाणारा गुन्हा आहे. याशिवाय बालकांवरील अत्याचार, ज्येष्ठ नागरिकांची फसवणूक आणि अल्पवयीन गुन्हेगारांची वाढती संख्या ही समाजासाठी गंभीर इशारा असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.एकंदरीत, गुन्हेगारीचे स्वरूप आता रस्त्यावरून थेट मोबाईल आणि इंटरनेटपर्यंत पोहोचले असून, भविष्यातील लढाई केवळ पोलिसांची नसून तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि नागरिकांच्या सायबर जागरूकतेची असणार आहे.

# अण्णाभाऊंचे साहित्य वाचल्याशिवाय त्यांच्या विचारांची खरी ताकद कळणार नाही : प्रा. कातोरे




**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** दलित, शोषित, कष्टकरी आणि वंचितांच्या वेदनेला आपल्या लेखणीची धार देत त्यांच्या संघर्षाला शब्द देणारे साहित्यसम्राट, लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांची १०६ वी जयंती उक्कडगाव येथे मोठ्या उत्साहात आणि वैचारिक वातावरणात साजरी करण्यात आली. ढोल-ताशांचा गजर, जयघोष, भव्य मिरवणूक आणि ग्रंथदिंडीमुळे गावात दिवसभर अण्णाभाऊंच्या विचारांचा जागर पाहायला मिळाला.जयंतीनिमित्त आयोजित ग्रंथदिंडीतून 'वाचन संस्कृती वाढवा, अण्णाभाऊंचे साहित्य घराघरात पोहोचवा' हा संदेश देण्यात आला. यावेळी सुनील महाडिक, बाजीराव महाडिक, राजू कातोरे, प्रसाद महाडिक, शंकर गोलांडे, प्रविण कातोरे, विलास महाडिक, बापूराव कातोरे, अनिलतात्या महाडिक, मच्छिंद्र कातोरे, संतोष कातोरे, अरुण महाडिक यांच्यासह पंचशील तरुण मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते. अमोल बोरगे, आबासाहेब बोरगे, तात्या बोरगे, प्रमोद आहेर, संतोष शेंडगे, मंगेश गायकवाड, पंकज शिंदे यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते, युवक, महिला, विद्यार्थी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# मुळा धरणातून तातडीने आवर्तन सोडा : आ. राजळे

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव :** पाऊस लांबल्यामुळे शेवगाव आणि पाथर्डी तालुक्यातील खरीप हंगामातील पिके कोमेजू लागली आहेत. तसेच ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. या गंभीर परिस्थितीची दखल घेऊन शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी आणि नागरिकांची पाण्याची समस्या सोडण्यासाठी मुळा धरणाचे आवर्तन तातडीने उजव्या कालव्यातून सोडण्यात यावे, अशी आग्रही मागणी आ. मोनिका राजीव राजळे यांनी राज्याचे जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे एका पत्राद्वारे केली आहे.



आ. मोनिका राजळे यांनी दिलेल्या पत्रात नमूद केले आहे की, शेवगाव आणि पाथर्डी तालुक्यातील शेतकऱ्यांचे संपूर्ण आर्थिक जीवनमान खरीप हंगामातील पिकांवर अवलंबून असते. चालू हंगामात शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने पेरण्या पूर्ण केल्या आहेत. मात्र, गेल्या काही दिवसांपासून पावसाने दडी मारल्यामुळे उभी पिके तहानलेली असून ती जळण्याच्या मार्गावर आहेत.

पिकांना या नजीकच्या काळात पाटपाण्याची अत्यंत नितांत गरज निर्माण झाली आहे.शेतीसोबतच तालुक्यांतील अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवू लागली असून, पाणी योजनांचे जलस्रोत कोरडे पडत आहेत. त्यामुळे मुळा पाटबंधारे विभागाच्या कार्यक्षेत्रातील त्रस्त शेतकऱ्यांनी आणि नागरिकांनी पाणी सोडण्यासाठी सातत्याने विनंत्या केल्या आहेत.

सुदैवाने, मुळा धरणात सध्या पुरेसा जलसाठा उपलब्ध आहे.

# चिंचोली काळदात रस्ता रोको : आ. जगतापांसह १५० जणांवर गुन्हा!

## जिल्हादंडाधिकाऱ्यांच्या आदेशाचा भंग केल्याचा आरोप

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**राशीन :** चिंचोली काळदात फाटा येथे सोमवारी (दि. १७ ऑगस्ट) झालेल्या रस्ता रोको आंदोलनाला आता कायदेशीर वळण मिळाले आहे. मिरजगाव पोलीस ठाण्यात तब्बल १०० ते १५० अनोळखी व्यक्तींसह १९ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणामुळे कर्जत तालुक्यात राजकीय व सामाजिक वर्तुळात खळबळ उडाली आहे.

पोलिसांच्या दैनिक अहवालानुसार, दि. १७ ऑगस्ट रोजी सकाळी ११ ते दुपारी २ वाजण्याच्या सुमारास चिंचोली काळदात फाटा चौक येथे संबंधित व्यक्तींनी बेकायदेशीर जमाव जमवून रस्ता रोको आंदोलन केल्याचा आरोप आहे. या आंदोलनामुळे श्रीगोंदा-जामखेड राज्य महामार्ग तसेच कर्जत-मिरजगाव मार्गावरील वाहतूक व नागरिकांच्या ये-जा करण्यास अडथळा निर्माण झाल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.

या प्रकरणात आमदार संग्राम जगताप तसेच धवलसिंह मोहिते, सोलापूर यांच्या उपस्थितीचा पोलिसांच्या अहवालात उल्लेख करण्यात आला आहे. त्याचबरोबर ॲड. आकाश हाळनवर, शुभम माने, चंदनसिंग परदेशी, नितीन तोरडमल, वैभव काळदाते, सावन शेटे, उदयसिंग परदेशी, दिपक गांगडे, विठ्ठलसिंह शेडगे, रघुआबा काळदाते, धनंजय बांदल, बाळासाहेब निंबोरे, राहुल मते, प्रसाद कानगुडे, बालाजी लाळगे, सुनील यादव व ऋषीकेश काळदाते यांच्यासह इतरांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिरजगाव पोलीस ठाण्यात गु.र.नं. ३१५/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता कलम २२३, १२६(२), १८९(२), १९०, २८५ तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१) (३) सह १३५ आणि क्रिमिनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट कलम ७ अन्वये कारवाई करण्यात आली आहे. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, जिल्हादंडाधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाचा भंग करून सार्वजनिक रस्त्यावर अडथळा निर्माण केल्याचा आरोप आहे. त्यामुळे आंदोलनकर्त्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक किरण व्ही. जगदाळे करीत आहेत. या प्रकरणामुळे चिंचोली काळदात येथील आंदोलन आता चांगलेच तापण्याची शक्यता निर्माण झाली असून, पोलिसांच्या पुढील तपासात आणखी कोणाची नावे समोर येणार आणि कारवाईची दिशा काय असणार, याकडे कर्जत तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# स्व.दादापाटील राजळे स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**तिसगाव :** सहकार महर्षी स्व. दादापाटील राजळे (भाऊ) यांच्या १०४ व्या जयंती निमित्त दादापाटील राजळे महाविद्यालय, आदिनाथनगर, ता. पाथर्डी येथे स्व. दादापाटील राजळे स्मृती व्याख्यानमालेचे गुरुवार दि. २० ऑगस्ट ते शनिवार २२ ऑगस्ट २०२६ या कालावधीत आयोजन केले असून व्याख्यानमालेचे हे २१ वे वर्ष आहे. अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजधर टेमकर यांनी दिली. व्याख्यानमालेचे उद्घाटन .डॉ. प्रशांत साठे उपप्राचार्य, बी.एम.सी.सी. कॉलेज, पुणे यांच्या शुभहस्ते होणार असून ते स्क्रीन टाईम ते ग्रीन टाईम या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. आमदार मोनिकाताई राजीव राजळे यांच्या अध्यक्षतेखाली या व्याख्यानमालेचे पहिले पुष्प गुंफले जाणार आहे. व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प प्रसिद्ध उद्योजक, वक्ता व लेखक बी. एन. धुमाळ यांच्या युवकांनो उद्योजक व्हा! या विषयावर व्याख्यान होणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ संचालक उद्धवराव वाघ हे असणार आहेत व्याख्यानमालेचा समारोप चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर सह्याद्री फार्म नाशिक, विलास शिंदे यांच्या शेतीतील संधी व उद्योजकता या विषयावरील व्याख्यानाने होणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माजी आमदार आप्पासाहेब राजळे हे भूषवणार आहेत. या कार्यक्रमास डॉ. हरिभाऊ मोरे अधिष्ठाता महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी, हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. यावेळी स्व. सौ. चंद्रभागाबाई दादापाटील राजळे सर्व सेवाभावी संस्था आदिनाथनगर यांचे वतीने तालुक्यातील गुणवंत विद्यार्थी व शिक्षकांचा सत्कार समारंभ होणार आहे. या कार्यक्रमासाठी बाबासाहेब किलबिले, राहुल राजळे, सुभाष ताठे, गुलाबराव राजळे, शिवाजीराव राजळे, शिक्षण संस्थेचे सर्व विश्वस्त उपस्थित राहणार आहेत.

# पावसाने रडवले; रानडुकरांनी उध्वस्त केले; बळीराजाच्या स्वप्नांची पिके मातीमोल!

## नगर तालुक्यात शेतकऱ्यांवर दुहेरी संकट; पंचनाम्याची मागणी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका :** निसर्गाची साथ मिळत नसल्याने आधीच चिंतेत असलेल्या बळीराजाच्या अडचणी आता रानडुकरांच्या हैदोसामुळे आणखी वाढल्या आहेत. पावसाने पाठ फिरवल्याने खरीप हंगामातील पिके धोक्यात आली असतानाच रानडुकरांचे कळप शेतात घुसून उभ्या पिकांची नासाडी करत असल्याने शेतकऱ्यांच्या मेहनतीवर पाणी फिरत आहे. नगर तालुक्यात रानडुकरांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याचे वन विभागाच्या बुद्ध पौर्णिमेच्या प्राणी निरीक्षणातून समोर आले आहे.

जेऊर परिसरात डोंगररांगा व वनक्षेत्र असल्याने रानडुकरांचा वावर मोठ्या प्रमाणात आहे. रात्रीच्या वेळी कळपाने शेतात घुसून मका, कडवळसह चारा पिके आणि इतर पिकांची नासाडी केली जात आहे. त्यामुळे पिके वाचविण्यासाठी शेतकऱ्यांना रात्रभर शेतात जागता पहारा द्यावा लागत आहे.

शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने खरीप पिकांची पेरणी केली. मात्र पावसाअभावी पिकांची वाढ खुंटत असतानाच रानडुकरांच्या उपद्रवाने शेतकऱ्यांसमोर नवे संकट उभे ठाकले आहे. काही ठिकाणी रानडुकरांनी पेरलेली मका व चारा पीक उगवण्याआधीच उकरून काढल्याने शेतकऱ्यांना दुबार पेरणीचा खर्च सहन करावा लागत आहे.

तालुक्यातील अनेक गावांमध्ये पाणीटंचाईमुळे टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे. अशा परिस्थितीत खरीप हंगाम हातातून जाण्याची भीती असताना रानडुकरांकडून होणाऱ्या नुकसानीने शेतकऱ्यांचे आर्थिक गणितच बिघडले आहे. खरीप हंगामाबरोबरच आगामी रब्बी हंगामाची चिंताही वाढली आहे.

रानडुकरांकडून झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई द्यावी तसेच वनविभागाने रानडुकरांच्या बंदोबस्तासाठी ठोस उपाययोजना कराव्यात अशी मागणी शेतकरी वर्गातून जोर धरत आहे.

**उगवण्याआधीच मका फस्त दुबार पेरणीचा भुर्दंड !**

एक एकर क्षेत्रावर मका पिकाची पेरणी केली होती. मात्र उगवण्याआधीच रानडुकरांनी नासाडी केली. त्यामुळे दुबार पेरणी करावी लागली. बियाणे व पेरणीचा अतिरिक्त खर्च झाल्याने मोठा आर्थिक फटका बसला आहे.

**शरद तोडमल**



**पेरलेला चारा डोळ्यांसमोर उद्ध्वस्त !**

सुमारे एक एकर क्षेत्रावर कडवळ चारा पिकाची पेरणी केली आहे. बियाणे व पेरणीसाठी मोठा खर्च केला. मात्र रानडुकरांनी मोठ्या प्रमाणात नासाडी केली. पावसाअभावी आधीच अडचणीत असताना आता रानडुकरांचा उपद्रव सहन करावा लागत आहे. रानडुकरांचा तातडीने बंदोबस्त करून नुकसानीचे पंचनामे व मदत मिळावी.

**सुरज तोडमल**

**उगवण्याआधीच मका फस्त ; दुबार पेरणीचा भुर्दंड !**

एक एकर क्षेत्रावर मका पिकाची पेरणी केली होती. मात्र उगवण्याआधीच रानडुकरांनी नासाडी केली. त्यामुळे दुबार पेरणी करावी लागली. बियाणे व पेरणीचा अतिरिक्त खर्च झाल्याने मोठा आर्थिक फटका बसला आहे.

**शरद तोडमल**

दैनिक
राष्ट्र सह्याद्री
बुधवार दि.१९ ऑगस्ट २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

# सोलापूरच्या माऊली कोकाटेने पटकावली मानाची चांदीची गदा

## पंढरपूरच्या माऊली जमदाडेला चितपट | नागपंचमीच्या आखाड्यात कुस्तीचा थरार



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : नागपंचमीनिमित्त सीना नदीकाठी श्री वारुळाचा मारुती मंदिर परिसरात भरलेल्या यात्रेच्या उत्साहात भव्य कुस्ती मैदानाचे आयोजन करण्यात आले. शहराचे आमदार संग्राम जगताप यांच्या सहकार्याने हिंदुत्व प्रतिष्ठान व नालेगाव ग्रामस्थांच्या वतीने, युवा नेते तथा नगरसेवक पै. महेश लोंढे यांच्या पुढाकारातून झालेल्या या मैदानात राज्यभरातील नामवंत मल्लांनी सहभाग घेतला. लाल मातीच्या आखाड्यात रंगलेल्या कुस्त्यांनी कुस्तीप्रेमींना रोमांचित केले.

मैदानातील मुख्य कुस्ती सोलापूरचा माऊली कोकाटे आणि पंढरपूरचा माऊली जमदाडे यांच्यात झाली. सुरुवातीपासूनच दोन्ही मल्लांनी आक्रमक पवित्रा घेत एकमेकांचा अंदाज घेतला. काही वेळ डावपेचांचा खेळ रंगला. अखेर माऊली कोकाटेने योग्य संधी साधत दमदार डाव टाकून जमदाडेला चितपट केले. कोकाटेच्या विजयाने आखाड्यात उपस्थित कुस्तीप्रेमींनी टाळ्यांचा कडकडाट करत जल्लोष केला. विजेत्या माऊली कोकाटेला आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते मानाची चांदीची गदा प्रदान करण्यात आली. आखाड्यात लहान-मोठ्या मल्लांच्या अनेक रंगतदार कुस्त्या झाल्या. मल्लांनी ताकद, चपळाई, तंत्र आणि डावपेचांचे उत्कृष्ट प्रदर्शन केले.

विजयी तसेच उपविजयी मल्लांना आयोजकांकडून रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. नालेगाव परिसराला कुस्तीची समृद्ध परंपरा असून नवोदित मल्लांना प्रोत्साहन मिळावे आणि कुस्ती संस्कृती जपली जावी, या उद्देशाने दरवर्षी कुस्ती मैदानाचे आयोजन केले जाते. यावेळी ज्येष्ठ पैलवान तथा वस्ताद मारुती खंडागळे यांचा ग्रामस्थांच्या वतीने विशेष सन्मान करण्यात आला.

मैदानासाठी पै. संभाजी लोंढे, उपमहाराष्ट्र केसरी पै. अनिल गुंजाळ यांच्यासह पंचांनी काम पाहिले. मैदान यशस्वी करण्यासाठी आयोजक अशोक घोडके, पै. सुनील कदम, पै. मिलिंद जपे, बाळासाहेब भापकर, दत्ता ठाणगे, विजय शिंदे तसेच हिंदुत्व प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# ‘डांबर मिळत नाही, म्हणून लोक दारू पितात!’

## ट्रम्प तात्यांना काँग्रेसचे उपरोधिक पत्र

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : नगर-मनमाड महामार्गाच्या रखडलेल्या कामावरून अहिल्यानगर जिल्ह्यात राजकीय आरोप-प्रत्यारोपांना धार आली आहे. माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी रस्त्याचे काम संथगतीने होण्यामागे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची कारणे असल्याचे वक्तव्य केल्याचा आधार घेत राहाता तालुका काँग्रेस कमिटीने थेट ‘ट्रम्प तात्या’ यांना उपरोधिक पत्र पाठविले आहे.

‘प्रति, डोनाल्ड ट्रम्प उर्फ ट्रम्प तात्या, व्हाईट हाऊस, अमेरिका’ अशा मजकुराने पत्राची सुरुवात करण्यात आली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून नगर-मनमाड महामार्गाचे काम अपूर्ण असून, खड्ड्यांमुळे अपघात, जीवितहानी, वाहनांचे नुकसान तसेच साईभक्त व स्थानिक नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे पत्रात म्हटले आहे.

‘या रस्त्याच्या दुरवस्थेला मंत्री, आमदार, खासदार, अधिकारी व ठेकेदार जबाबदार असल्याचे आम्हाला वाटत होते. मात्र, डॉ. सुजय विखे यांनी खरी वस्तुस्थिती सांगितली असून ट्रम्प यांच्यामुळे डांबर मिळत नसल्याचे समोर आले,’ असा टोला काँग्रेसने लगावला आहे.

यापुढे पत्रात ट्रम्प यांच्या कथित धोरणांमुळे डांबर उपलब्ध होत नसल्याने नागरिकांचे नुकसान होत असून, या त्रासामुळे काही लोक दारूचे सेवन अधिक प्रमाणात करू लागल्याची उपरोधिक टिप्पणी करण्यात आली आहे. ‘नगर-मनमाड रस्त्यासाठी तातडीने डांबर उपलब्ध करून द्यावे, म्हणजे रस्ता पूर्ण होईल आणि लोक दारू पिणेही कमी करतील,’ अशी खोचक मागणी पत्रातून करण्यात आली आहे.

काँग्रेसचे हे पत्र ट्रम्प यांच्यापर्यंत पोहोचते का आणि पोहोचल्यास त्यावर काय प्रतिक्रिया येते, याबाबत जिल्ह्यात उत्सुकता आहे.

# पिकातून जाण्यास मज्जाव केल्याने जावेला विहिरीत ढकलले

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : तालुक्यातील ब्राह्मणगाव वेताळ येथे मकाच्या पिकातून जाण्यास मज्जाव केल्याच्या कारणातून एका महिलेला विहिरीत ढकलून जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना घडली. योगिता सुनील वेताळ यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांची जाऊ अनिता अनिल वेताळ हिने पिकातून जाण्यास विरोध केल्याच्या रागातून शिवीगाळ व मारहाण करत त्यांना विहिरीत ढकलून दिले. योगिता यांनी केलेल्या आरडाओरडामुळे शेजारील शेतात काम करणाऱ्या लोकांनी धाव घेऊन त्यांचे प्राण वाचवले. याप्रकरणी अनिता अनिल वेताळ, अनिल शिवाजी वेताळ आणि सत्यजित अनिल वेताळ यांच्याविरुद्ध ( सर्व रा. ब्राम्हणगाव वेताळ ता.श्रीरामपूर ), शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहेत.

# खंडाळ्यात जुगारावर पोलिसांची कारवाई, चौघे ताब्यात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : तालुक्यातील खंडाळा गावातील पाटाच्या पुलाजवळील एका टपरीच्या अडोशाला पैसे लावून जुगार खेळणाऱ्या ’चौघा’ जुगारड्यांना श्रीरामपूर शहर पोलिसांनी कारवाई करत रंगेहात पकडले आहे.पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. सावळेराम सुरेश गुंजाळ, किशोर रामदास जाधव, राहुल विश्वनाथ थोरात आणि जमीर समशोद्दीन शेख (सर्व रा. खंडाळा) अशी पकडलेल्या संशयितांची नावे आहेत. पोलिसांनी घटनास्थळावरून जुगाराचे साहित्य आणि रोख रक्कमेसह एकूण ५ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहेत.

# आक्षेपार्ह व्हिडीओप्रकरणी एकावर गुन्हा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : धार्मिक तेढ निर्माण होईल, व सार्वजनिक शांतता धोक्यात येईल, असा आक्षेपार्ह :इन्स्टाग्राम रिल्स’ तयार करून सोशल मीडियावर अपलोड करणाऱ्या एका तरुणावर श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहेत. शहरातील सिद्धार्थनगर, वॉर्ड क्र. १ येथील चेतन विजय गायकवाड याने हे कृत्य केले आहेत. गुप्त माहितीच्या आधारे शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विशाल खैरे यांच्या पथकाने संशयित चेतन गायकवाड याला ताब्यात घेतले. त्याच्याकडील २० हजार रुपये किमतीचा मोबाईल जप्त करण्यात आला असून, पुढील तपास शहर पोलीस करीत आहेत.सदरचा व्हिडीओ डिलीट केल्याचे पोलिसांनी सागितले.

# साखरपुड्याचे आमिष, दोन लाखांची फसवणूक, सात जणांविरुद्ध गुन्हा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : भावाचे लग्न जमवून देण्याच्या बहाण्याने साखरपुडा करून, दोन लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याप्रकरणी प्रशांत पुरुषोत्तम कुलकर्णी ( रा. लक्ष्मीनारायणनगर, लेकटाऊन, गोंधवणी रोड, श्रीरामपूर) यांनी फिर्याद दिली. पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४), ३१९(२), ३५१ (२), ३(५) अन्वये गुन्हा दाखल केला आहेत. फिर्यादीनुसार, त्यांच्या भाऊ शुभम याचे लग्न जमवून देण्याच्या उद्देशाने आरोपी ११ ऑगस्ट रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास त्यांच्या घरी आले.यावेळी आरोपींनी शुभम याच्याशी साखरपुडा केला. त्यानंतर विविध कारणे सांगून फिर्यादीकडून २ लाख ६० हजार रुपये घेतले. त्यापैकी ६० हजार रुपये परत करून उर्वरित २ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप आहेत. या प्रकरणी मच्छिंद्र पुंड (औसा, जि. लातूर) यांच्यासह सात जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पो.स.ई हंडाळ पुढील तपास करीत आहेत.

# ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ ‘परमेष्ठी सुपर शॉपी’ सील

## अन्न व औषध प्रशासनाची धडक कारवाई

### मुदतबाह्य खाद्यपदार्थ आढळल्याने व्यवसाय बंद




**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** : शहरातील लाडगाव रोडवरील ‘परमेष्ठी सुपर शॉपी’वर अन्न व औषध प्रशासनाने मंगळवारी (दि. १८) धडक कारवाई केली. तपासणीदरम्यान खाद्यपदार्थांची साठवणूक, स्वच्छता तसेच विक्रीबाबत गंभीर अनियमितता आढळून आल्याने प्रशासनाने दुकानाचा व्यवसाय तात्काळ बंद करून प्रतिष्ठान सील केले. अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी दुकानाची अचानक तपासणी केली असता परिसरातील अस्वच्छता तसेच खाद्यपदार्थांच्या साठवणुकीबाबत नियमांचे उल्लंघन आढळले. यावेळी मुदतबाह्य खाद्यपदार्थ विक्रीसाठी ठेवण्यात आल्याचेही निदर्शनास आले.

मुदत संपलेले खाद्यपदार्थ ग्राहकांना विक्रीसाठी उपलब्ध करून देणे गंभीर बाब असून, त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. खाद्यपदार्थांची गुणवत्ता, योग्य साठवणूक आणि स्वच्छतेचे नियम पाळणे अन्न व्यावसायिकांसाठी बंधनकारक आहे. मात्र, तपासणीत या नियमांकडे दुर्लक्ष झाल्याचे आढळल्याने प्रशासनाने कारवाई केली. अन्न सुरक्षा व मानके नियम, २०११ मधील नियम २.१.१४ (१) अंतर्गत दुकानाचा व्यवसाय तातडीने बंद करण्याचे आदेश देण्यात आले. त्यानंतर प्रशासनाच्या पथकाने दुकान सील केले. सर्व त्रुटी दूर करून नियमांचे पालन केल्याशिवाय व्यवसाय सुरू करता येणार नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. बंदी आदेशाचे उल्लंघन करून दुकान पुन्हा सुरू केल्यास संबंधितांविरुद्ध कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे. या कारवाईमुळे शहरातील खाद्यपदार्थ व किराणा विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

# ११ गोवंश जनावरांची कत्तलीतून सुटका

## शहर पोलिसांची कारवाई



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : शहरातील रहेमतनगर परिसरात अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेने धडक कारवाई करत कत्तलीच्या उद्देशाने बेकायदेशीररीत्या डांबून ठेवलेल्या ११ गोवंशीय जनावरांची सुटका केली. या कारवाईत पोलिसांनी एकूण १ लाख ७० हजार रुपये किमतीची जनावरे ताब्यात घेतली असून, याप्रकरणी संगमनेर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अहिल्यानगर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी जिल्ह्यात गोवंशीय जनावरांची अवैध वाहतूक व कत्तलीसाठी होणाऱ्या हालचालींवर कठोर कारवाई करण्याचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक तयार करण्यात आले होते.सोमवारी, १७ ऑगस्ट रोजी हे पथक संगमनेर शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंद्यांबाबत माहिती घेत असताना रहेमतनगरजवळील आर. के. प्लॉटींगच्या बाजूला असलेल्या काटवनात गोवंशीय जनावरे डांबून ठेवल्याची गुप्त माहिती मिळाली.

या माहितीची खातरजमा करून पोलिसांनी पंचांसमक्ष संबंधित ठिकाणी छापा टाकला. त्यावेळी लहान मोठी अशी ११ गोवंशीय जनावरे आढळून आली. ही जनावरे चारा पाण्याची कोणतीही व्यवस्था नसलेल्या अवस्थेत बांधून ठेवण्यात आल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. पोलिसांनी तातडीने सर्व जनावरांना ताब्यात घेत त्यांची सुटका केली.

> या पथकाने केली कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन आणि पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या सूचनेनुसार पोलीस उपनिरीक्षक विकास जाधव, पोलीस अंमलदार गणेश लोंढे, योगेश कर्डीले, बाळासाहेब गुंजाळ व रोहित येमुल यांच्या पथकाने केली. स्थानिक गुन्हे शाखेच्या या कारवाईमुळे संगमनेर शहर परिसरातील अवैध गोवंश वाहतूक व कत्तलीच्या प्रकारांवर पोलिसांचे लक्ष असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# श्रीरामपुरात अंमली पदार्थ विरोधी जनजागृती अभियान



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलांतर्गत श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्याच्या वतीने आयोजित ’अमली पदार्थ विरोधी जनजागृती अभियानानिमित्त’ आयोजित निबंध स्पर्धेस विद्यार्थ्यांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. रयत शिक्षण संस्थेच्या चंद्ररूप डाकले जैन कॉलेज येथे अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे व उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धा पार पडल्या आहेत. रयतच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या मीनाताई जगधने यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले. यावेळी पोलीस निरीक्षक विशाल खैरे व प्राचार्य डॉ. संजय कांबळे उपस्थित होते. या निबंध स्पर्धेत परिसरातील ७ वी ते महाविद्यालयीन स्तरावरील एकूण ५१८ विद्यार्थ्यांनी उत्साहात सहभाग घेऊन ‘नशामुक्त भारत’ या विषयावर प्रभावी लेखन केले. दरम्यान, १९ ऑगस्ट रोजी चित्रकला व रांगोळी स्पर्धा, तर २० ऑगस्ट रोजी वकृत्व स्पर्धा होणार आहेत. तसेच २१ ऑगस्ट रोजी सकाळी ७:३० वाजता आर.बी.एन.बी. कॉलेज मैदान येथून भव्य जनजागृती रॅली काढण्यात येणार असून, नागरिकांनी यात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहेत.

# धनगरवाडीत हरिनामाच्या गजरात १७९ वा अखंड हरिनाम सप्ताह सुरू

## पहिल्याच दिवशी लाखावर भाविकांची उपस्थिती



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा/वाकडी**: सद्गुरू योगीराज श्री गंगागिरी महाराज यांच्या १७९ व्या अखंड हरिनाम सप्ताहाला मंगळवारी (दि. १८) श्रीक्षेत्र धनगरवाडी येथे भक्तिमय वातावरणात प्रारंभ झाला. सप्ताहाच्या पहिल्याच दिवशी सुमारे एक लाख भाविकांनी उपस्थिती लावत दर्शन व महाप्रसादाचा लाभ घेतला. महंत रामगिरीजी महाराज यांच्या उपस्थितीत पंचपदी होऊन टाळ-मृदंगाच्या गजरात अखंड हरिनामाला सुरुवात झाली. सप्ताहासाठी महाराष्ट्राच्या विविध भागांतून वारकरी, टाळकरी व भजनी मंडळे दाखल झाली आहेत. सात दिवसांत तब्बल १६८ तास अखंड भजन होणार असून, दररोज चार पहाऱ्यांत सुमारे तीन हजार टाळकरी सहभागी होणार आहेत. सप्ताहाच्या प्रारंभी फुलांनी सजविलेल्या रथातून महंत रामगिरी महाराजांची श्रीरामपूर ते धनगरवाडी भव्य मिरवणूक काढण्यात आली. मार्गावर रांगोळ्या, फुलांची उधळण आणि हरिनामाच्या जयघोषात महाराजांचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. विविध शाळांची झांज, लेझीम व ढोल पथके, रामायण व संत परंपरेवरील देखावे, अश्वनृत्य, आदिवासी नृत्य तसेच विविध रथ मिरवणुकीचे आकर्षण ठरले. चार ते पाच हजार दुचाकीस्वारांनी भगवा ध्वज घेऊन भक्ती रॅलीत सहभाग घेतला. पंचक्रोशीतील २५ गावांतील स्वयंसेवकांनी महाप्रसाद, पाणी, स्वच्छता व वाहतूक व्यवस्थेची जबाबदारी सांभाळली.

सप्ताहस्थळी चार एकरांवर कृषी प्रदर्शनही भरविण्यात आले आहे. दररोज कीर्तन-प्रवचनांचे आयोजन करण्यात आले असून, दि. २५ ऑगस्ट रोजी महंत रामगिरी महाराजांच्या काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता होणार आहे. भाविकांच्या सुरक्षेसाठी १२ पोलीस अधिकारी, ३०० पोलीस कर्मचारी, १०० होमगार्ड व १० बाऊन्सर असा कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

# चिंचपूरमध्ये बिबट्याचा म्हशीच्या पारडावर हल्ला



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी** : संगमनेर तालुक्यातील चिंचपूर येथे वस्तीवर आलेल्या बिबट्याने म्हशीच्या पारडावर हल्ला करून त्याचा फडशा पाडल्याची धक्कादायक घटना सोमवार, दि. १७ ऑगस्ट रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास घडली. या घटनेमुळे परिसरातील शेतकरी व पशुपालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. चिंचपूर येथील नंदकुमार सुखदेव सातपुते यांच्या गट क्रमांक २९०/१ मधील घराजवळील गोठ्यात बिबट्या अचानक आला. काही क्षणांतच त्याने एका म्हशीच्या पारडावर झडप घालून हल्ला केला. या हल्ल्यात पारडाचा मृत्यू झाला. कुटुंबीयांनी आरडाओरड करून धाव घेतल्याने बिबट्याने तेथून शेताच्या दिशेने पलायन केले. घटनेची माहिती सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र आरगडे यांनी वनविभागाला दिली. वनाधिकारी साळवे व वनरक्षक डेंगळे यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. यावेळी राजेंद्र आरगडे, पोलीस पाटील दत्तात्रय तांबे, माजी सरपंच शंकर तांबे, किसन तांबे, भाऊसाहेब तांबे यांनी बिबट्याला जेरबंद करण्यासाठी तातडीने पिंजरा लावण्याची मागणी केली. दरम्यान, चिंचपूरजवळील सादतपूर येथील मगरवस्ती परिसरातही १७ ऑगस्ट रोजी दिवसा बिबट्या मांजर व कुत्र्यांचा पाठलाग करताना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला.

# चंदनापुरीत खताचा काळाबाजार

## कृषी सेवा केंद्र चालकावर गुन्हा, १४ गोणी युरिया साठा जप्त

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : रासायनिक खतांचा अनधिकृत साठा करून त्याची विनाबिल विक्री केल्याचा प्रकार संगमनेर तालुक्यातील चंदनापुरी येथे उघडकीस आला. कृषी विभागाच्या पथकाने कारवाई करत शिवकृपा कृषी सेवा केंद्रातून ३ हजार ७२४ रुपये किमतीच्या युरियाच्या १४ गोण्या जप्त केल्या. याप्रकरणी कृषी अधिकारी दत्तात्रय साळुंखे यांच्या फिर्यादीवरून कृषी सेवा केंद्र चालक मंगेश ज्ञानदेव रहाणे याच्याविरुद्ध संगमनेर तालुका पोलिसांत अत्यावश्यक वस्तू कायदा, १९५५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चंदनापुरी येथील शिवकृपा कृषी सेवा केंद्रात युरियाची गाडी उतरवून छुप्या पद्धतीने खताची विक्री केली जात असल्याची माहिती कृषी विभागाला मिळाली होती. त्यानुसार उपविभागीय कृषी अधिकारी अक्षय गोसावी, तंत्र अधिकारी किरण विरकर व गुणनियंत्रण अधिकारी ओमकार यन्नम यांच्या पथकाने दुकानाची पाहणी केली. त्यावेळी काही शेतकरी युरियाच्या गोण्या घेऊन जात असल्याचे आढळले. दुकानासमोर एका शेतकऱ्याकडे आरसीएफ कंपनीच्या युरियाच्या दोन गोण्या आढळल्या. त्याने खत शिवकृपा कृषी सेवा केंद्रातून घेतल्याचे सांगितले; मात्र त्याला विक्रीचे बिल देण्यात आले नसल्याचे चौकशीत स्पष्ट झाले. त्यानंतर पथकाने दुकानाची तपासणी केली असता खत विक्रीची अधिकृत बिले न देणे, बिलांच्या नोंदी व्यवस्थित न ठेवणे आणि पॉस मशीनवर युरिया साठ्याची नोंद नसल्याचे आढळले. दुकानाशेजारील परवान्यात समाविष्ट नसलेल्या गाळ्यात तपासणी केली असता अनधिकृतपणे साठवलेला १४ गोणी युरिया आढळला. हा खतसाठा आपलाच असल्याचे रहाणे यांनी अधिकाऱ्यांना सांगितले. या कारवाईमुळे खत विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली आहे.